नासा येवतीकर



# हरवलेले डोळे

नासा येवतीकर

ई साहित्य प्रतिष्ठान

हरवलेले डोळे

# नासा. येवतीकर

पत्ता - मु. येवती पो. येताळा
ता. धर्माबाद जि. नांदेड
पिन - 431809
मोबाईल क्रमांक - 9423625769
Email id - nagorao26@gmail.com
Blog address - http://nasayeotikar.blogspot.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १५ ऑगस्ट २०१७

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अल्प परिचय

** नाव : नागोराव सा. येवतीकर



** पत्ता : मु. येवती पोस्ट येताळा
ता. धर्माबाद जि. नांदेड

** व्यवसाय : प्राथमिक शिक्षक
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरली
ता. बिलोली जि. नांदेड

जन्मदिनांक : 26 एप्रिल 1976

छंद : शालेय जीवनापासुनच लिखाण करण्याची फारच आवड त्यामुळे विविध वर्तमानपत्र, दैनिक, साप्ताहिक, मासिकात वैचारिक लेख लिहिण्याचा छंद आहे. जीवन-शिक्षण या शैक्षणिक मासिकातून सुध्दा यापूर्वी लेख प्रकाशित झाले आहेत. सध्या दैनिक लोकपत्रच्या दर सोमवारी ऑफ पिरियड सदराखाली क्रमशः लेख प्रकाशित होत आहेत, ज्यात शैक्षणिक विषयी विचार मांडत असतात. लहान मुलांसाठी सुध्दा छोटेखानी लेख लिहितात तसेच त्याना मनोरंजनातून शब्दसंपत्ती वाढवी यांसाठी विविध मनोरंजक शब्दकोडे तयार करतात. जे की दर रविवारी दैनिक देशोन्नतीच्या फनक्लब पेज वर गेल्या दीड वर्षापासुन क्रमशः प्रकाशित होत आहे. विद्यार्थ्यांना सतत कामात व्यस्त ठेवण्यासाठी विविध उपक्रम तयार करतात आणि त्या उपक्रमाच्या माध्यमातून शिकविण्याचा प्रयत्न असतो.

# प्रस्तावना

पाऊलवाट, संवेदना, मी एक शिक्षक या पुस्तकांच्या यशानंतर माझा पहिला कथासंग्रह “हरवलेले डोळे” हे पुस्तक आपल्या हाती देताना मला मनस्वी विशेष आनंद होतो आहे. या कथा मनोरंजनासह सामाजोक जाणीव जागी करण्याचे कार्यही करतील अशी आशा आहे. या पुस्तकात काही चूका किंवा त्रुटी असतील तर त्या माझ्या निदर्शनास आणुन दिल्यास मी आपला अत्यंत आभारी राहीन. पुस्तकातील विचार पर्यायाने पुस्तक आवडल्यास आपल्या मित्र परिवारात जरूर share कराल अशी अपेक्षा करतो. धन्यवाद

- नागोराव सा. येवतीकर

★★★★★★★★★★★★★★★★★★★

अर्पण पत्रिका

लेखनासाठी

प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रोत्साहित करणारे

माझ्या आई-वडीलासह

सर्वांना अर्पण ...........

नागोराव सा. येवतीकर

★★★★★★★★★★★★★★★★★★★

अनुक्रमणिका

* खरी संपत्ती *

* नावाची लक्ष्मी *

* गुरुदक्षिणा *

* परीक्षा गुरुजींची *

* एका पुरुषाची आत्मकथा *

* मुख्यालय *

* प्रामणिक वसंता *

* मुलगी झाली हो. . . . . .

* अपेक्षाभंग *

* हरवलेले डोळे *

* साहस *

* संघर्ष *

* सुंदर *

* व्यसन *

* शिक्षणाची ज्योत *

* डिजिटल शाळा *

* अंधारातील दिवा *

( या कथांतील सर्व पात्रे, स्थळे, प्रसंग व नावे काल्पनिक असून, याचा प्रत्यक्ष काही संबंध नाही. यदा कदाचित तसा काही संबंध आल्यास तो निव्वळ योगायोग समजावे. )

# *खरी संपत्ती *

अमित हा बँकेत कारकून. त्याची पत्नी नयना प्राथमिक शाळेत शिक्षिका. दोघांनाही चांगला पगार होता. त्यांचं कुटुंब सुखी व समाधानी होतं, अमन व पूजा नावाची दोन गोंडस मुलं देवाने त्यांच्या पदरात दिली होती. त्यांच्या जीवनात कोणत्याच गोष्टीची वाणवा नव्हती, टुमदार घर, गाडी, कलर टीव्ही, फ्रीज आदी साऱ्या चैनीच्या वस्तू त्यांच्या घरात होत्या. जशी पगारात वाढ होऊ लागली. तशी चैनीच्या वस्तूंची गर्दी घरात वाढू लागली; परंतु नयना ही वेगळया स्वभावाची होती. ती स्वार्थीपणाने विचार करणारी होती. त्यामुळे राजा-राणीच्या संसारात तिने सासू व सासऱ्याला स्थानच दिले नाही. जेव्हा अमन जन्मला तेव्हा तिला एका बाईची गरज भासू लागली. त्यामुळे आता तरी ती आई-वडिलांना बोलविण्यास सांगेल हा अमितचा विचार पुरता फोल ठरला. अमनचा सांभाळ करण्यासाठी एका कामवाली बाईला महिना पाचशे रूपयांच्या बोलीवर तिने ठेवून घेतले. अमनची जबाबदारी बाईवर सोपवून दोघेही आपापल्या नोकरीला जाऊ लागले. त्यांचे दिवस तसे मजेत व आनंदात जात होते. सुट्टीच्या दिवशीच त्यांना मोकळा वेळ मिळायचा, तोही कोणत्या ना कोणत्या कार्यक्रमाने निघून जायचा. त्यामुळे त्यांच्या कुटुंबात कधी प्रेमाचे संवाद ऐकायला वा बघायला मिळतच नव्हते, नेहमी धावपळ असायची. त्यांच्या शेजारीच लहानशा घरात मोहन व त्याची पत्नी सुमन यांचे कुटुंब राहत होते. मोहन एका खाजगी कंपनीत नोकरी करीत होता, त्याची पत्नी सुमन आपले घरकाम सांभाळून शिवण, मेहंदी क्लास चालवत होती. सुमन ही नावाप्रमाणेच चांगल्या मनाची होती. सासू-सासरे वृद्ध झाल्यामुळे त्यांच्याने काही काम करवत नाही म्हणून त्यांना येथेच बोलावून घेण्याचा हट्ट तिने मोहनजवळ धरला होता. मात्र मोहनचा तुटपुंजा पगार, त्यात आपलेच घर नीट चालत नाही, तेव्हा त्यांची कशी व्यवस्था करणार? त्यापेक्षा ते गावाकडे जास्त आनंदी राहतील, अशी धारणा मोहनची होती; पण सुमन ऐकायला तयार नव्हती. त्यामुळे मोहनला अखेर आपल्या आई-वडिलांना बोलावून आणावे लागले. त्यांनीसुद्धा आपल्या मुलांची समस्या जाणून घेऊन एकाच खोलीतल्या त्या घरात अॅडजेस्ट झाले.

आपल्यामुळे मोहनला त्रास होणार नाही. याकडे त्यांनी लक्ष ठेवले. त्यामुळे त्यांचा काडीमात्र त्रास वाटत नव्हता, उलट घरातील लहानसहान कामे ते करू लागले. सुमन आणि मोहनला सुधीर आणि सुधा अशी दोन मुलं होती. लहानाचे मोठे होताना त्यांचा शिक्षणावरील खर्चही वाढू लागला. त्यांनी आपल्या मुलांना मराठी माध्यमाच्या शाळेत टाकलं. सुमन बारावीपर्यंत शिकलेली होती. त्यामुळे सायंकाळी त्यांचा सराव घेऊ लागली. सायंकाळी आजोबाच्या तोंडून रामरक्षा स्त्रोत्र, रामायण, महाभारतातील गोष्टी, श्लोक ऐकून मुलं शांतपणे झोपू लागली. सुधीर, सुधा यांच्यावर चांगले संस्कार घडू लागल्याने त्यांची प्रगती होऊ लागली. याउलट अमित व नयना यांनी आपल्या दोन्ही मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश दिला. त्यांना पैशाची काळजी नव्हती; पण मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी खूप पैसा ओतून प्रसिद्ध असलेल्या शाळेत टाकले. मुलांना काय हवे काय नको हे पाहण्यासाठी या दोघांना नोकरीच्या धावपळीत वेळच मिळत नव्हता. आजी-आजोबांचे प्रेम तर त्यांना पुस्तकातूनच मिळायचे, त्यामुळे दोन्ही मुलं मानसिकदृष्ट्या खचू लागली. अमन शाळेत कमी व बाहेर जास्त राहू लागला. पॉकेटमनीचे पैसे उडवीत मित्रांसोबत मजा करू लागला. पूजा हट्टी स्वभावाची बनत गेली. त्यामुळे तिला कुणी मैत्रीण मिळाली नाही. शालांत परीक्षेचे दिवस जवळ आले तसे अमित व नयनाला मुलांची काळजी वाटू लागली. परीक्षा संपून निकाल लागला, तेव्हा अमन अगदी कमी गुण मिळवून उत्तीर्ण झाला. पुढे चांगले शिक्षण घेऊन सुधीर डॉक्टर होऊन जेव्हा मोहन व सुमनच्या पाया पडत होता तेव्हा त्यांची छाती गर्वाने फुलून गेली. अमन मजा करण्यासाठीच कॉलेजला जातराहिला. त्यांचे पूर्ण जीवन आई-वडिलांच्या पैशावरच चालू होते. ते अखेरपर्यंत पैसा या बनावट संपत्तीच्या मागेच धावत होते; परंतु खरी संपत्ती असलेल्या आपल्या लेकरांकडे कधी पाहिले नाही. त्यामुळे आज त्यांचा मुलगा बेकार बनून घरी बसला आहे. अर्थात संस्कारित मुलं हीच खरी संपत्ती आहे.

……………………………***************………………

## *नावाची लक्ष्मी *

सरर्र. . . . . असा दुरवरून आवाज ऐकू आला. तसा आवाजाच्या दिशेने मागे वळून पाहिलं तर कडेवर एक लहान मूल घेवून येणारी बाई दृष्टीस पडली. जेमतेम वीस-बावीस वर्षाची ती पोरगी ; परंतु वयाने वयस्कर वाटावी अशी दिसत होती. जवळजवळ पळतच ती माझयाजवळ आली. मी काही बोलण्याच्या अगोदरच ती म्हणाली, "सर मला ओळखलं नाही का? " मी नकारार्थी मान हलवून नाही एवढंच उत्तर दिलं. ओळखीचा चेहरा वाटत होता, परंतु नाव व गाव लक्षात येत नव्हते. शेवटी तिनेच सांगितले "सर, मी वर्गात उशीरा येणारी आणि अर्धा तास आधीच जाणारी. . . " तिचे शब्द अर्धवट तोडत मला तिचे नाव आठवले आणि म्हटलो "तुझे नाव लक्ष्मी ना !" बरोबर, लगबग दहा-बारा वर्षानंतर तिची भेट झाली. तिची ती अवस्था पाहून तिला अनेक प्रश्न विचारून तिची माहिती काढली. मनोमन खुप दु:ख वाटलं. तेवढ्यात माझी बस आल्यामुळे मी तिचा निरोप घेतला आणि शाळेला जाणाऱ्या बसमध्ये एका खिडकीपाशी येऊन बसलो. बस वेगात धावत होती. अनेक लहान-मोठी झाडे त्याच वेगात मागे जात होती. माझे मन सुद्धा दहा-बारा वर्षापूर्वीच्या गावातील शाळेला जाऊन पोहोचले. गावात पहिली तेसातवी वर्गापर्यंतची सरकारी शाळा होती. गावात सर्वच जातीतील लोक समसमान अशी होती. परंतु हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच लोक सधन होते. तर बाकी सर्व मजुरी करून उदरनिर्वाह करणारे कुटूंब होते. शाळेतील मुलांचा गणवेश, त्यांचे दप्तर, राहणीमान पाहून मनाला थोडं उत्साह आला. याठिकाणी काही तरी निर्माण करायचे आहे. . . या निश्चयाने सातव्या वर्गाची हजेरीपट घेवून वर्गात प्रवेश केलो. वर्गात एकूण वीस मुले, त्यापैकी आठ मुली होत्या. उपस्थिती बऱ्यापैकी. मुलांची हजेरी घ्यायला सुरूवात केली. एकानंतर एक हजरी देत होते. लक्ष्मी. . . . असे नाव उच्चारताच तिची मैत्रीण म्हणाली, सर ती येईल एवढ्यात. थोड्याच वेळानंतर ती आली. मी तिच्यावर रागावणार होतो, परंतु तिची अवस्था पाहून मला तिच्यावर कीव आली आणि वर्गात बसण्याची परवानगी दिलो. गरगरीत गोल चेहरा, केस विस्कटलेले, अंगावर फाटलेले कपडे आणि घाईघाईत ती शाळेला आली आहे, असे वाटत होते. यापुढे उशिरा यायचे नाही अशी तंबी देऊन तिला वर्गात बसविले. वर्गातील मुलांची चाचणी घेऊन कोण कसा आहे? हे पाहण्यासाठी काही प्रश्न

विचारले तेव्हा सर्वच्या सर्व प्रश्नांच्या उत्तरांसाठी तिचे हात वर होते. लक्ष्मी चुणचुणीत, चाणाक्ष व हुशार आहे, हे माझ्या बुद्धीने तेव्हाच हेरले. दुपार टळली होती, शाळा सुटायला जेमतेम अर्धा तास बाकी असतांना. ती दबक्या पावलांनी माझ्या जवळ आली आणि घरी जाण्याची परवानगी मागू लागली. हे असे तिचे रोजचेच होते, परंतु या गोष्टीचा छडा लावायचा या हेतूने एके दिवशी शाळेत लवकर आलो आणि सरळ लक्ष्मीचे घर गाठले. मारूतीच्या पारासमोर असलेलं झोपडं म्हणजे लक्ष्मीचे घर. लक्ष्मी. . . . अशी हाक दिल्याबरोबर ती झोपडीच्या बाहेर आली. हात पिठाने माखलेले. . . ती भाकरी करीत होती. बाजूलाच तिचे दोन भावंडे खेळत होती. घरात दुसरे कोणी नव्हते. मी म्हटलं, लक्ष्मी, तुझे आई-बाबा कुठे आहेत? यावर ती मनात दु:ख आवरून म्हणाली. गावच्या पाटलांच्या मळयात आई-बाबा मजुरी करतात. सकाळी लवकर मळयात जातात. शाळेची घंटा वाजल्यावर आई मळयातून येते आणि बाबांसाठी भाकरी घेऊन जाते, सोबत यांना पण नेते. तेव्हा मला कळाले की, लक्ष्मी ही शाळेत उशिरा का येते. घरातील झाडलोट, धुणीभांडी, स्वयंपाक हे सर्व तिलाच करावी लागत असे. घरच्या गरीब परिस्थितीमुळे तिच्या शिक्षणात अनेक संकटे येत होती. परंतु तिचा शिकण्याचा निर्धार पक्का होता. तिची खरीखुरी परिस्थिती सर्वांना कळाल्यावर वर्गातील सर्व मुले आणि शाळेतील शिक्षकांनी तिला सर्वतोपरी मदत करण्याचा ठाम निश्चय केला आणि शालेय गणवेश, काही वह्या, कंपासपेटी, दप्तर, पेना तिला मदत म्हणून दिल्या. खरोखरच ती खूप हुशार आणि एकपाठी होती. प्रथम सत्र परीक्षेत तिने प्रथम क्रमांक मिळविला होता. दिवाळीच्या सुट्टया संपल्या आणि शाळेला सुरूवात झाली. सुट्ट्यानंतर शाळेचा पहिला दिवस. वर्गात जेमतेम मुले उपस्थित होती. वर्गात प्रवेश केला आणि हजेरी घ्यायला सुरूवात केली. एकानंतर एक मुले हजेरी देत होती. लक्ष्मी. . . नाव उच्चारताच मीच म्हटलं, येईल ती थोड्या वेळात. यावर तिची मैत्रीण म्हणाली, ती येणार नाही. तिच्या घरचे सर्व जण गेलेत, दुसरीकडे राहायला. मी म्हणालो, म्हणजे काय? मुलांना काही माहित नव्हतं. म्हणून तिच्या व कुटुंबाविषयीची विचारणा गावातल्या मोठ्या लोकांशी केली असता गावच्या पाटलानं कामावरून कमी केल्यामुळे ते कामाच्या शोधात गेली आहेत. दुसऱ्या गावाला अशी माहिती मिळाली. तसा मी हताश झालो. मनात वाटलं की, प्रजासत्ताक दिनी साऱ्या गावकऱ्यासमक्ष तिचा सत्कार करावा आणि तिचं भविष्य घडवावं. परंतु नियतीला काही दुसरेच मान्य होते, सत्र संपले. तिच्या नावापुढे

सतत अनुपस्थित असा शेरा मारून त्या वर्षांच्या सारी पानं बांधल्या गेली. दहा-बारा वर्षानंतर आज तिची भेट झाली. त्यात तिच्या सोबत झालेल्या बातचितमूळे मन विषण्ण झालं. ती सांगत होती, त्या दिवशी पाटलांकडे बाबा दिवाळी खरेदीसाठी पैसा मागायला गेला होता. परंतु पाटलांनी पैसे देण्याऐवजी बाबांवर चोरीचा आळ ठेवून पंचायत बसविली आणि आमचं घर क्षणभरसुद्धा येथे थांबू नये असा पंचांनी निर्णय दिला. त्याच रात्री आम्ही तेथून निघालोत आणि मिळेल तिथं काम करून राहू लागलो. या रस्त्यावरच माझी सोयरिक झाली, लग्न झालं आणि मूलंही जन्मलं. सर, मला खूप शिकायचं होत पण. . . म्हणत ती डोळयातून पाणी आणू लागली. तिच्यासोबत माझेही डोळे पाणावले. ती फक्त नावाची लक्ष्मी होती. प्रत्यक्षात तिच्याकडे जर लक्ष्मी असती तर ती आज एका चांगल्या पदावर दिसली असती. आज देशात अश्या कित्येक लक्ष्मी गरीबी व दारिद्रयामुळे आपले शिक्षण अर्धवट सोडतात. त्यांच्याजवळ असलेली बुद्धीमत्ता त्यांनाही वापरात येत नाही ना देशाच्या काही कामी येत नाही. याच तंद्रीत माझ्या शाळेचे गाव आले. बसच्या घंटीने मी भानावर आलो. तसाच खाली उतरलो. शाळेत गेलो आणि चिमुरड्या त्या मुलांसोबत खेळण्यात रंगून गेलो.

................................ ***************..................

## *गुरुदक्षिणा *

मोटे सरांना मोबाईलवर बोलल्यापासून डॉ. गिरीश अस्वस्थ वाटत होता. त्यांच्या चेहऱ्यावर काळजीची लकेर स्पष्ट दिसत होती. पहिल्यांदाच मोटे सरांनी त्यांच्याकडे एक अपेक्षा व्यक्त केली होती. ती अपेक्षा पूर्ण करणे डॉ. गिरीशच्या डाव्या हाताचा मळ होता. परंतु त्यासाठी मोटे सरांना डॉ. गिरीश ज्या दाते मेमोरियल हॉस्पीटल मध्ये काम करत होता त्या मुंबईच्या दवाखान्यात येणे आवश्यक होते. यासाठी मला काय करता येईल? याच विचाराच्या तंद्रीत खुर्चीला मान टेकवून मोटे सरांनी संकटात आपणासं कशी मदत केली? त्याच्या मदतीने आपण आज या खुर्चीवर बसू शकलो नाही तर. . गिरीश मनोहर काकडे हा सातपूर गावातील राहणारा. त्याच्या आईवडिलांकडे एक गुंठा सुध्दा जमीन नव्हती. मोलमजुरी करुन ते आपला उदरनिर्वाह करीत. सुटीच्या दिवसात गिरीश सुध्दा त्यांच्या सोबत मजुरीला जाऊन तेवढाच वडिलांच्या कारभाराला हातभार लावीत असे. गिरीशचे वडील स्वातंत्र्यपूर्व काळातील चौथी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते. तर त्याची आई अक्षरशत्रू होती. सातपूर गावात फक्त सातवीपर्यंतचीच शाळा होती. पुढील शिक्षणासाठी येथील मुलांना दहा किमी दूर असलेल्या तालुक्याच्या गावी जावे लागत. तेथे जाण्यासाठी ना बसची सोय ना रेल्वेची. शिकायचं असेल तर तेथेच जाऊन रहावे लागायाचे. गिरीश चांगले मार्क घेऊन सातवी पास झाला. पुढील शिक्षणासाठी त्याला आता तालुक्यातला जायचे होते. पुढे शिकण्याची त्याची खुप इच्छा होती. परंतु घरची आर्थिक बिकट परिस्थिती आणि आईच्या हट्टामुळे गिरीशच्या शिक्षणावर पाणी पडणार, असे वाटतांना त्याच गावातील परंतु तालुक्याच्या ठिकाणच्या सरस्वती विद्यालयात गणिताचे शिक्षक असलेले श्री विनायक संपतराव मोटे यांनी गिरीशच्या वडिलांना खूप समजाविल्यानंतर ते गिरीशला पाठविण्यास तयार झाले. गिरीश हा एक चुणचुणीत आणि चाणाक्ष विद्यार्थी होता. सातव्या वर्गात त्याला 80 टक्के गुण मिळाले होते. मोटे सरांनी त्यांचे गुणपत्रक पाहिले आणि त्याच्या पाठीवर शाबासकीची शाप दिली. गिरीशला मोटे

सरांची फक्त तोंडओळख होती. परंतु आज त्यांना जवळुन पाहतांना ते खरोखरच नावाप्रमाणे मोठे जाणवत होते. शाळा सुरु होण्याच्या पहिल्या दिवशीच मोटे सरांनी त्याला आपल्या सायकलवर बसवून शाळेला नेले. त्यांच्याच सरस्वती शाळेत आठव्या वर्गात प्रवेश मिळवून दिला. शहरातली ती मोठी शाळा पाहून गिरीश हैरान झाला. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंगावर महागडा पोशाख होता, पायात पायमोजेसह बुट होते आणि दोन्ही खांद्याला बॅग लटकवलेली होती. तर गिरीशकडे फाटलेला ड्रेस, पायात फाटकी चप्पल आणि मेनकापडात काही वहया, आपला येथे निभाव लागणार नाही या विचारात तो चितांग्रस्त बनला होता. सरांनी त्याला प्रवेश तर मिळवून दिला परंतु रहायचे कोठे आणि खायचे काय? हा यक्ष प्रश्न त्यांच्यासमोर होता. प्रवेश झाल्यानंतर दिवसभर शाळा करुन सायंकाळी सरांनी गिरीशला घरी नेले. एक, दोन,नव्हे तब्बल पंधरा दिवस त्यांनी गिरीशला आपल्या घरी ठेवले, त्याला जेवण दिले. सातव्या वर्गात त्याला चांगले गुण होते म्हणून सरांनी शासकीय वस्तीगृहात अर्ज भरुन दिला होता. सरांना व गिरीशला त्याचीच प्रतिक्षा होती. वसतीगृहात नंबर लागतो की नाही. अखेर तो आनंदाचा दिवस उजाडला गिरीशला वसतीगृहात प्रवेश मिळाला. आता मोटे सरांची काळजी मिटली होती. गिरीशला वस्तीगृहात प्रवेश देऊन परततांना सरांनी गिरीशला धीर दिले आणि काही लागलं केलं तर बिनधास्त मला मागायचं, घाबरायच नाही. गिरीश हा शांत स्वभावाचा आणि मनमिळावू वृत्तीचा होता त्यामुळे त्याला अनेक मित्र लाभले. वस्तीगृहातून त्याला पेन, पुस्तक, वही, ड्रेस आणि जेवण इ. मोफत मिळत होते त्यामुळे आता त्याला कश्याचीच काळजी नव्हती. त्याची शाळेतील तयारी खूप चांगल्या प्रकारे चालु होती. तसा तो हुशार होता परंतु शहरातल्या मुलांच्या स्पर्धेत तो मागे पडू लागला. ती सर्व मुलं श्रीमंत घरातली होती, त्यामुळे वर्गातल्या शिक्षणाबरोबरच त्यांना शिकवणी सुध्दा होतं तर गिरीश आर्थिक परिस्थितीमुळे शिकवणी लावू शकत नव्हता. इंग्रजी व गणित विषयात अधिक गुण मिळविण्यासाठी शिकवणी लावणे गरजेचे आहे. ही शंका मोटे सरांना बोलून दाखविले. मोटे सर स्वतः गणिताचे शिक्षक होते आणि त्यांची इंग्रजी ही चांगली होती. त्यामुळे सरांनी त्यास शिकवणी लावण्यास सहमती दर्शविली. त्याचा अभ्यास आता चांगला चालला होता. आठव्या वर्गातून शाळेत द्वितीय येण्याचा मान अखेर त्याला मिळाला. उन्हाळी सुट्टयात गावी परतलेल्या गिरीशच्या तोंडावरील

प्रसन्नता पाहुन आईवडिलांनाही अपार आनंद झाला. दरम्यान संस्थाचालकांनी मोटे सरांना जबरदस्तीने वॉलेन्ट्री घेण्यास भाग पाडले. ही बाब गिरीशला शाळा सुरु झाल्यावर कळाली तेंव्हा खुप दुःख झाले. मोटे सर आता पूर्ण वेळ रिकामे झाले होते. दोन मुलींच्या लग्नामुळे ते स्वतः कर्जबाजारी झाले होते. परंतु त्यांनी गिरीशला हे कधी जाणुव दिले नाही. गिरीश रात्रंदिवस अभ्यास करुन माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष प्रावीण्यात तर बारावीच्या परीक्षेत विज्ञान शाखेतुन राज्यातून विसावा क्रमांक मिळविला होता. प्रतिकूल परिस्थितीत मिळालेल्या या यशामुळे आईवडिलांचा आनंद गगनात मावत नव्हता तर मोटे सरांना आभाळ ठेंगणे वाटत होते. गिरीशला पुण्याच्या वैद्यकिय महाविद्यालयात प्रवेश तर मिळालाच शिवाय राज्य सरकारची शिष्यवृत्ती ही. काही वर्षानंतर गिरीश वैद्यकीय अभ्यास पूर्ण करुन डॉक्टर बनला. स्वतःचे हॉस्पीटल थाटण्याएवढी ऐपत नसल्यामुळे मुंबईच्या दाते मेमोरियल हॉस्पीटलात नौकरी स्विकारली. आईवडिल आणि मोटे सरांचे आर्शिवाद घेऊन गिरीश मुंबईला गेला. त्यानंतर वर्ष भरानी आज मोटे सरांचे मोबाईल वर बोलणे झाले.

सेवानिवृत्तीच्या दहा वर्ष अगोदरच त्यांना वॉलेंट्री घ्यावी लागली आणि दोन मुलींचा लग्नाचा बोझा त्यामुळे असली नसली पूंजी सर्व त्यातच गेली. इतरांवर नेहमी उपकार करणाऱ्या सरांवर मात्र आज खूपच वाईट वेळ आली होती. अधूनमधून त्यांना किडनीचा त्रास जाणवत होता. त्यावर ऑपरेशन हा एकच इलाज बाकी होता आणि त्यासाठी जवळपास लाख दीड लाख खर्च अपेक्षित होते. आज घडीला त्यांच्याकडे एवढी रक्कम नव्हती. गिरीशला फोन करुन त्रास द्यावा असं त्यांना मुळीच वाटले नाही. परंतु सरांचे दुखणे गिरीशच्या आईवडिलांना कळाले तसे ते शहरात धावत आले आणि याबाबतीत गिरीशची मदत घेण्याचा तगादा लावला. त्याचमुळे मोटे सरांनी आज गिरीशच्या मोबाईलवर बोलले. गिरीश दवाखान्यात कामाला येऊन वर्ष झाले नव्हते. त्यामुळे त्याच्याकडे सुध्दा पैशाची चणचण होती. परंतु एका वर्षाच्या कारकिर्दीत त्याने दाते मालकांचा आणि तेथील स्टाफमधील लोकांची मने जिंकली होती. गिरीश खुर्चीवरुन उठला आणि डॉ. दाते यांच्या केबिनकडे धाव घेतली. डॉ. दाते सुध्दा मनाने खूप चांगले होते. त्यांनी डॉ. गिरीशला होकार देत पुढच्या पंधरा दिवसात त्यांच्या किडनीच्या ऑपरेशनची तारीख दिली. गिरीश मनोमन धन्यवाद देत बाहेर पडला आणि आईवडिलासोबत

मोटे सरांना येण्यास कळविले. डॉ. दाते यांनी ठरलेल्या दिवशी सर्व टेस्ट रिपोर्ट पाहून मोटे सरांचे किडनीचे ऑपरेशन यशस्वी रित्या पार पाडले. डॉ. गिरीश स्वतः किडनी स्पेशालिस्ट असल्यामुळे, तो जातीने तिथे हजर राहुन हे काम केले. महिनाभर दवाखान्यात व गिरीशच्या क्वार्टरमध्ये राहून ते गावी जाण्यासाठी निघाले. मोटेसर मुंबईत आले तेंव्हा ते चिंताग्रस्त होते. परंतु आज परत जातांना त्यांच्या प्रसन्न चेहऱ्याने डॉ. गिरीशला मनातल्या मनात खूप आनंद होत होता. आज माझ्या मुलांने आपल्या गुरुला खरी गुरुदक्षिणा दिल्याचा अभिमान डॉ. गिरीशच्या आईवडिलांना वाटत होते.

................................ ***************..................

## *परीक्षा गुरुजींची *

आज सदा पायमोडे गुरूजी फारच चिंताग्रस्त दिसत होते. त्यांचा चेहरा पूर्ण उतरलेला होता, काय करावे त्यांना कळतच नव्हते. कारण ही तसेच होते. आज शाळेत प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत सहामाहीची परीक्षा सुरू झाली आणि वर्गातील अर्धे मूले अनुपस्थित होते. ज्यांना काहीच येत नाही ते नेमके आज परीक्षेला हजर होते आणि ज्यांना बऱ्यापैकी लिहिता-वाचता येते ते गैरहजर होते. त्यामूळे गुरूजीला काळजी लागली होती. तसे गेल्या आठवडाभरांपासून गुरूजी परिपाठमध्ये सर्व मूलांना सूचना देतच होते की पुढच्या आठवड्यात आपली 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमांतर्गत संकलित चाचणी होणार आहे तेव्हा कोणी गैरहजर राहू नका, गावाला जाऊ नका, मुलांच्या पालकांना देखील या परीक्षेची आगाऊ सूचना देऊन ठेवली होती. एवढे सारे करून देखील आज वर्गातील अर्धे मुले गैरहजर होती. काय करावे? या प्रश्नाने गुरूजींचे डोके सकाळी सकाळीच उठले होते.

शहरांपासून १५-२० किमी अंतरावर असलेल्या जेमतेम ५०० लोकसंख्या असलेल्या बोरगाव वस्तीत सदा पायमोडे गुरूजी गेल्या दोन वर्षापासून गुरूजी म्हणून काम करू लागले होते. तसे पाहिले तर त्यांचे आडनाव पाटील होते. पण त्यांचे वडिल जे की याच शाळेत गुरूजी होते. आणि येथूनच सेवानिवृत्त झाले. मुलांना काही आले नाही किंवा गैरहजर राहिले तर ते मुलांच्या पायावर मारायचे. एके दिवशी दुसऱ्या वर्गातील रमेश चार दिवस शाळेत आला नाही म्हणून दामोदर गुरूजी त्यांच्या घरी भेटण्यास गेले. रमेश अंगणात खेळतांना पाहून गुरूजींच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याच्या पायावर छडी मारत मारत गुरूजी शाळेत त्याला शाळेत आणले. पायावर जास्त मार बसल्यामुळे रमेश जवळपास लंगडूच लागला. त्या दिवशी पासून त्यांचे नाव पायमोडे गुरूजी असे नाव पडले. ( शाळेत दोन शिक्षक होते आणि दोन्ही शिक्षकांचे नाव पाटीलच होते. मग पाटील सर म्हटले की कोणते पाटील? असा कोणी विचारले की शाळेतील पोरं आणि गावातील लोकं पायमोडे गुरूजी असे म्हणायचे ) गुरूजी आपल्या संपूर्ण

परिवारासह त्याच गावात राहायचे. शेवटचे १५-२० वर्षे त्यांनी त्याच गावात काढले. तेथेच त्यांनी शेती विकत घेतली, घर बांधले आणि तेथेच राहू लागले. त्यांचा एकुलता एक मुलगा सतिश हा मुळातच हुशार होता. तो डॉक्टर व्हावा असे घरातील सर्वांना वाटायचे कारण तसा त्याचा अभ्यासही होता. मात्र सरकारच्या विविध जाचक नियम अटी व असुविधेमूळे त्याला कोणत्याच मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळाला नाही. शेवटचा पर्याय म्हणून आणि आई-वडिलांच्या आग्रहाखातर त्याने डी. एड्. चे शिक्षण पूर्ण केले. मूळात हुशार असल्यामूळे तो शासनाच्या सर्व प्रकारच्या परीक्षा सहज उत्तीर्ण होत होता. तीनच वर्षात त्याला शिक्षण सेवक म्हणून त्याच्याच गावात नोकरी मिळाली. डॉक्टर होण्याचे स्वप्न विसरून तो शाळेत मन लावून मुलांना शिकवत होता. स्वत:च्या ज्ञानाचा फायदा मुलांना व्हावा यासाठी त्याने सर्व प्रकारे प्रयत्न करत होता. वडिल मुलांना मारत मारत शाळेत आणत होते पण सदा गुरूजी मात्र अत्यंत प्रेमाने समजावून सांगून आणण्याचा प्रयत्न करत असत.

बघा ना ! आज प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत परीक्षेला सर्व मुले उपस्थित रहावे म्हणून त्याचा सर्व खटाटोप पाण्यात मिसळला होता. स्वत: गावात राहत असल्यामुळे गावातील प्रत्येक कुटूंबाची जवळून ओळख होती. गुरूजी सकाळीच लवकर तयार होऊन प्रत्येक मुलांच्या घरी भेट देत होते. काल शाळेला जे आले नव्हते त्यांच्या घरी पहिल्यांदा भेट द्यायचे ठरविले अन शिल्पाच्या घरी गेले आई बाहेरच सोयाबीनचे शेंगा खालीवरी करीत होती. गुरूजी म्हणाले, राधा मावशी, शिल्पा कोठे आहे? काल शाळेला आली नाही. ती म्हणाली, घरात हाय, अन बापू आजपण येणार नाय ! यावर गुरुजींच्या कपाळावर आठ्या पडल्या, चिंतेच्या स्वरात गुरुजी म्हणाले “अहो मावशी, आज महत्वाची परीक्षा आहे. आज तरी तिला पाठवा हो”. यावर शिल्पाची आई जवळ जवळ रागात बोलली “ सोयाबीन कोण जमा करणार? आधीच माणसं भेटेनाशी झाली. तुमची परीक्षा उद्या नाही तर परवा घ्या". नाही मावशी तसे चालत नाही. आज सगळीकडे परीक्षा आहे तिला शाळेला पाठवा. शिल्पा शाळेला ये ती गुरूजीला पाहून घरात लपून बसली. तशी ती हुशार म्हणता येणार नाही पण बऱ्यापैकी लिहिता-वाचता येणारी पण आठवड्यातून २-३ दिवस घरकामासाठी शाळा बुडवते ती तरी काय करणार? गुरूजीला प्रत्येक वेळी हाच अनुभव यायचा.

तेथून त्यांचा मोर्चा वळला कृष्णाकडे त्याचे वडिल गाडीवरून पडले होते आणि जबर मार लागला होता. आईला मदत करणेसाठी घरात कृष्णाच्या व्यतिरिक्त कोणीच नव्हते म्हणून तो गेल्या दोन दिवसांपासून शाळेला आलेला नव्हता. कृष्णाची शाळेला यायची इच्छा होती. गुरूजी परिस्थिती पाहून काही एक न बोलता 'काळजी घ्या' म्हणून घराबाहेर पडले. तेथून बाजूलाच स्नेहाचे घर होते. ती काल शाळेला आली होती. हुशार चुणचुणीत आणि रोज शाळेला येणारी मुलगी म्हणून तिची शाळेत ओळख होती. गुरूजीला आश्चर्य वाटले, की तिच्या घराला कुलूप होते. शेजारच्यांना विचारले की स्नेहाचे घरचे कुठे गेले? केव्हा येणार आहेत? शेजारच्याने सांगितले "गुरूजी, काल रात्री स्नेहाला खूप ताप आला होता. ताप डोक्याला चढला होता म्हणून सकाळी पहिल्या गाडीला स्नेहाला घेऊन त्यांचे आई-बाबा शहरात गेलेत. गुरूजींनी लगेच मोबाईल काढले आणि स्नेहाच्या बाबांना फोन लावला, हॅलो, रामराव काका नमस्कार, काय झालं स्नेहाला? " "गुरूजी तिला रात्री डोक्याला ताप चढला होता. सकाळी पहिल्या गाडी ला घेऊन आलोय डॉक्टर कडे "

"काय म्हणाले डॉक्टर? " " डेंगू ताप आहे म्हणे एक-दोन दिवस लागतील बरे व्हायला. "

" ठीक आहे काळजी घ्या तिची " असे म्हणून गुरुजी शाळेकडे निघाले. वर्गात येऊन बघतात तर काय अर्धे मुले उपस्थित झाली होती. भारताच्या क्रिकेट टीम मध्ये सचिन, सौरव, राहुल आणि धोनी नसेल तर टिमची जी हालत होते तीच काही हालात आज सदा गुरुजींची झाली होती. कशी बशी परीक्षा घेतली. कोणी ही जास्त मार्क घेऊ शकले नाहीत. दुसऱ्यांच दिवशी ते तापसलेले मार्क ऑनलाइन भरायचे असल्यामुळे लगेच तपासून त्याचे गुण भरण्यात आले आणि सर्व पेपर्सचा गठ्ठा मुख्याध्यापकांच्या हाती देऊन सदा जड पावलाने घरी पोहोचला. परीक्षा मुलांची होती मात्र काळजी गुरुजींना लागली होती.

................................***************..................

## *एका पुरुषाची आत्मकथा *

मी एक पुरुष. माझा जन्म पुरुष योनीत झाला आणि समाज मला पुरुष म्हणून ओळखू लागला. मी लहानाचा मोठा होऊ लागलो. समाज मला माझ्या कामाची जाणीव करून देऊ लागली. हे काम तुझे नाही, तू हे काम करू नये, अश्या प्रकारचे सल्ले देऊ लागले. त्यामुळे माझी काय काय कामे आहेत? मी काय करावे? हे मला कळु लागले. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मी संपूर्ण घर डोक्यावर घेऊ लागलो. चॉकलेट, बिस्कीट किंवा हव्या असलेल्या वस्तुची मागणी रडून का होईना पूर्ण करून घेऊ लागलो. तरी सुध्दा मला प्रसाद म्हणजे मार मिळत नव्हता कारण घराचा मीच एकमेव कुलदीपक होतो. माझ्यशिवाय वंश कसे पुढे जाईल? दिवसभर खेळ खेळणे, उडया मारणे, इतरांशी वाद करणे, भांडण करणे यातच मी पूर्ण वेळ घालवायचो. शाळेचा अभ्यास पूर्ण न केल्यामुळे शिक्षकांची छडी खाणे ही सर्व कामे मी शालेय जीवनात अगदी नेटाने पूर्ण केली. मुलींच्या कामाला अजिबात हात लावायचे नाही अशी शपथ घेतली होती. म्हणून वेळ प्रसंगी उपाशी झोपलो पण मुलींच्या कामाला कधीही हात लावला नाही. माझे वय वाढू लागले तसा मी आत्ता मोठा झालो. घरातील लोकांचे माझ्यावरील प्रेम हळू हळू कमी होत आहे असे दिसू लागले. पूर्वी मला जे मागितले ते मिळायचे ती माझी मागणी आत्ता सर्रास फेटाळली जाऊ लागली. रडत बसण्यापेक्षा मला माझ्यासाठी व घरासाठी पैसे कमाविणे गरजेचे वाटू लागले. मी वयात आल्यानंतर माझे दोनाचे चार हात झाले. सोज्वळ दिसणाऱ्या पत्नीने माझ्या जीवनात गृहप्रवेश केला येथूनच माझ्या दुसऱ्या जीवनास प्रारंभ झाला. या पूर्वी मी घरातील सर्व सभासदावर सारखेच प्रेम करीत होतो, परंतु लग्न झाल्यावर घरातील व्यक्तीत विशेष करून आई, बहीण वर माझे प्रेम कमी झाले असा गोड गैरसमज करून घेऊन पत्नी सोबत त्यांचे मतभेद दिसू लागले. लेकी बोले सुने लागे असा काहीसा प्रकार माझ्या कानावर ऐकू येऊ लागला. मी फक्त पत्नीचे ऐकतो व तिच्या बोलण्यानुसार वागतो असे आरोप माझ्यावर होऊ लागले. मी आत्ता पूर्वीचा राहिलो नाही. आईचे ऐकावे तर पत्नी

रागावते अन पत्नीचे ऐकावे तर आई नाराज होते. माझी स्थिती अडकित्यात सापडलेल्या सुपारीप्रमाणे झाली. मला ना माझी आई समजून घेते ना पत्नी. अश्या विपरीत स्थितीत मी करावे तरी काय? मग काही गोष्टी मी नळी फुंकिले सोनारे इकडून तिकडे वाहे वारे या म्हणीप्रमाणे सोडून देत गेलो. जेंव्हा ही बाब हाताच्या बाहेर जाऊ लागली. त्यावेळेस मनात नसताना सुद्धा कुटुंबातून विभक्त होण्याचा निर्णय मनावर दगड ठेवूनघ्यावा लागला. मग सुरु झाला येथून माझी तारेवरची कसरत. पूर्वी मला कुटुंबाकडे लक्ष द्यायची गरज नव्हती. पण आत्ता विशेष लक्ष द्यावे लागत होते. माझ्या मुलाना आजी-आजोबांच्या गोष्टी ऐकायला मिळत नव्हत्या. त्यांचे प्रेम मिळत नव्हते. विभक्त झाल्यावर पत्नी आनंदात राहते परंतु मी मात्र आतल्याआत ओल्या लाकडासारखा धूर सोडत जळत राहतो. ज्यांची झळ फक्त मलाच कळते आणि जाणवते. घर, नोकरी आणि मुलांचे सुखदुःख या चक्रातून माझे जीवन चालत चालतच राहते. परंतु मला कोणी ही समजून घेत नाहीत. स्त्रियांच्या हालअपेष्टा, त्यांना होणारा त्रास विविध वाहिन्या चॅनेलवरील मालिकेतून दाखविल्या जातात. म्हणून त्यांच्या विषयी प्रत्येकाच्या मनात कणव निर्माण होते. माझी आंतरिक व्यथा मात्र कोणालाच समजून पडत नाही, कोणत्याही वाहिन्या चॅनेलवर दाखविली जात नाही. त्यामुळे माझी कथा नेहमीच दुर्लक्षित राहिली आहे. मला कोणी समजून घेतले नाही तरी चालेल निदान जीवनभर साथ देणाऱ्या अर्धांगिनीने म्हणजे माझ्या बायकोने तरी समजून घेतले तर माझे पुरुष जन्म धन्य झाले असे समजेन.

................................ ***************..................

## *मुख्यालय *

शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याची सक्ती करण्याचा ठराव जिल्हा परिषदेत पारित करण्यात आला हे वृत्त वाचल्याबरोबर रामराव गुरूजीच्या छातीत धस्सं केल. आज काही तरी अवघड बातमी वाचायला मिळणार याची गुरूजीला खात्री होती. कारण आज जिल्हा परिषदेत शिक्षण विभागासाठी फक्त खास बैठक बोलाविण्यात आली होती आणि त्यात जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविता यावी यासाठी विविध उपाय योजनेवर चर्चा अपेक्षित होती. झाले ही तसेच शिक्षक मंडळी मुख्यालयी म्हणजे शाळेच्याच गावात राहिल्याशिवाय शाळा सुधारणार नाही आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुद्धा, त्यासाठी शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करण्याचा ठराव सर्वांच्या संमतीने पारित करण्यात आला. तीच बातमी प्रत्येक पेपरच्या मुखपृष्ठावर प्रकाशित झाली होती. शाळा सुरूवात होवून आठवडा सुद्धा उलटला नाही की या बातमीने गावात चर्चेला उधाण भरलं. गावातले काही उडाण पोरान बातमी वाचली होती, त्यांनी गुरूजीला बघून मग, काय मास्तर केव्हा येणार गावात राहायला? अशी उपरोधात्मक बोलू लागली. शाळेला येता येताच ही बातमी वाचल्यामुळे गुरूजी अस्वस्थ मनाने शाळेत आले होते. शाळेची घंटा वाजली, परिपाठ संपला नियमित वर्गाला सुरूवात झाली परंतु गुरूजीचे मन कोठेच लागेना बायको लेकरं याच काय? त्यांना सोबत ठेवू की मी एकटाच गावात राहू? या विचाराच्या तंद्रीत दिवसभर राहिल्यामुळे चेहरा कोमजून गेला होता. चेहऱ्यावरचा रोजचा तेज आज लुप्त झाला होता. दुपारी डब्बा जेवताना सुद्धा त्यांचे लक्ष जेवणावर नव्हते. त्यांच्यासोबत इतर ४-५ सहकारी मंडळी होती. ती मात्र ही बातमी वाचून अजिबात डगमगले नाहीत त्यांना कसलीच काळजी वाटत नव्हती. या त्रासातुन सुद्धा काही तरी नक्की मार्ग काढू असा विश्वास त्यांना वाटत होता. त्यामुळे ते कधीच घाबरत नव्हते. रामराव गुरूजी मात्र छोट्या मोठ्या घटना वाचल्या की, त्यांच्या छातीत धडकी भरे. म्हणूनच त्यांचे मित्र त्यांना विनोदाने भित्रे गुरूजी म्हणत असत. तसे त्यांचे नाव रामराव कात्रे परंतु ते नेहमी भितात

त्यामुळे त्यांचे नाव कात्रे च्या ऐवजी भित्रे असे नामकरण करण्यात आले. रामराव कात्रे गुरूजी हे वडगावचे राहणारे जेमतेम शे पाचशे लोकांच्या वस्तीतील त्या गावात गुरूजीचे एक छोटेसे घर होते आणि त्या घरात आई बाबा सोबत त्याची बायको राधा आणि दोन लेकर आनंदात राहत होती. वडगावच्या जवळ म्हणजे साधारणपणे १२-१५ किमी अंतरावरील बोरगाव येथे गुरूजीला नौकरी मिळाल्यामुळे तो खुश होता. आई बाबा पण आनंदातच होते. घरीच भाकर खावून नौकरी करणे फार सोपे काम असते. चांगले स्थळ बोलून आलं गुरूजींचे लग्न थाटात झाले. वर्षामागून वर्ष सरली आणि गुरूजींना दोन लेकरं ही झाली. राधाच्या मनात राहून राहून वाटत असे की, आपण शहरात जावून राहावं. परंतु गुरूजी आई बाबाचा एकूलता एक मुलगा. त्यामुळे त्यांना एकटे सोडून जाणे गुरूजींना शक्यच नव्हते. याच कारणावरून त्यांच्यात नेहमीच धुसफूस चालत असे. परंतु गुरूजी कसे तर समजावून करून राधाला पटवीत असत आणि संसाराचा गाडा चालवित असत. परंतु आजच्या बातमीने गुरूजी खूपच चिंताग्रस्त होवून शाळा सुटल्यानंतर घरी परतले. घरी आल्यानंतर ही त्यांचे कुठेच मन लागेना शेवटी राधा न राहवून म्हणते की, काय हो, काय झालय? या प्रश्नावर गुरूजी काय उत्तर देणार त्यांनी राधाला पेपर दिला आणि वाचण्यास सांगितले. ज्या बातमीने गुरूजी दु:खी कष्ट व नाराज झाले होते तीच बातमी वाचताना राधाच्या मनात आनंदाच्या उकळया फुटत होत्या. कारण या निमित्ताने तरी घर सोडायला मिळेल असे तिला वाटायला लागले परंतु तिने आपल्या चेहऱ्यावरील भाव कोणाला समजू दिले नाही. दिवे लावली आणि रात्री जेवण्याच्या वेळी गुरूजींनी आपल्या आई-बाबासमोर त्या बातमीचा विषय ठेवला. सगळयांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह फक्त त्यास राधा अपवाद होती. जेवताना एकदम नीरव शांतता होती. शेवटी बाबांनी दीर्घ श्वास घेत म्हटले, रामा तु तुझ्या बायको लेकरासह बोरगावला जा राहायला. आम्ही राहतो इथे शेती घर बघत. काही काळजी नको. सरकारने नियमच केला तर त्याला कोण काय करणार? यावर गुरूजी काय बोलणार अगदी गुमाण जेवण करून आपल्या खोलीत झोपायला गेला. झोपण्यापूर्वी राधाने आपल्या मनातील विचार व्यक्त करण्यासाठी तोंड उघडले, बाबांनी तर परवानगी दिली चला आपण सर्व बोरगावला राहू. राधेला ही बातमी म्हणजे सुवर्णसंधीच वाटत होती आणि ही संधी सोडायची नाही असा ठाम निर्धार केला होता. यावेळी सुद्धा गुरूजींनी राधेची समजूत काढली प्रथम १-२ महिने मी एकटा राहतो त्यानंतर आपण सर्वजण राहू

असे बोलून दोघेही गाढ झोपी गेले. सकाळ झाली गुरूजी बोरगावला जाण्याची तयारी करू लागले आज त्यांच्या सोबत फक्त जेवणाचा डबा नव्हता तर निदान चार पाच दिवस त्या गावात मुक्काम करायच्या तयारीने सर्व साहित्याची बांधाबांध केली. आई बाबांचा आशीर्वाद घेऊन गुरूजी निघाले. ते थेट शाळेतच आले आपल्या सर्व सामानासह गावात खोली साठी शोधाशोध केली नाही कारण राहण्यायोग्य घरे त्या ठिकाणी नव्हतीच मग काय करणार शाळेतील एका वर्गाच्या कोपऱ्यात बांधून आणलेले सर्व साहित्य ज्यात अंथरूण, पांघरूण, स्वयंपाकाचे सामान, ड्रेस, अंडरवियर, बनियान, टॉवेल इ. टाकून ठेवले तेथेच शिकवायचे आणि तेथेच रहायचे असा बेत गुरूजींनी आखला तेथे ना लाईटची सोय ना पाण्याची. सकाळी कोणी उठण्याच्या अगोदर पानवाल्याच्या विहीरीवर जायचे दोन बादल्या आपल्या अंगावर टाकायचे एक भांडे पाणी भरायचे आणि परत शाळेवर यायचे. मुले शाळेत येण्यापूर्वीच सकाळचा स्वयंपाक व जेवण आटोपून घ्यायचे. सकाळी काहीच सवड मिळत नव्हती. हे सगळं करेपर्यंत शाळेचीच वेळ व्हायची. सायंकाळी मात्र हमखास वेळ मिळायचा. एक दोन दिवस गुरूजीला सुद्धा याचा कंटाळा आला. सायंकाळची वेळ काही केल्या कटत नव्हती. शाळा सुटल्यावर चार पाच पोरांना शिकवावे असे एका मताने म्हटले परंतु दिवसभराचा कलकलाट ऐकून कंटाळा आलेला असतांना पुन्हा पोरांना शिकविणे नको रे बाबा वाटले. शनिवारच्या दिवशी दुपारच्या शाळेला सुट्टी असत म्हणून शाळा संपल्यावर गावी जाण्याचे नियोजन केले. सायंकाळी पर्यंत गावी आल्यानंतर पोर बाबा आले बाबा आले म्हणत पळत गुरूजीला बिलगली आई बाबांना पण आनंद वाटला अन् राधेची तर कळी खुलली होती. गावात खोली भेटली असेल आणि रविवार नंतर सोमवारी बोरगावला जाण्याचा योग येईल या विचाराने राधा खुश होती परंतु गुरूजींनी जेवण झाल्यानंतर राधेला सांगितले की, गावात खोली मिळाली नाही आणि ते शाळेच्या एका खोलीत बस्तान मांडले आहेत. राधा ते ऐकून निराश झाली आणि काही न बोलता झोपी गेली. रविवार सुट्टीचा दिवस अगदी मजेत गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी लगबगीने तयार होऊन गुरूजी शाळेच्या रस्त्याला निघाले. गावी दीड दिवस कधी संपला हे कळालेच नाही. स्वयंपाक करून खाण्याचा कंटाळा येऊ लागला सायंकाळी खुप कंटाळवाणे वाटू लागले. शाळेतल्या गावात कोणी मित्र नाही ना नातलग ज्याच्या सोबत गप्पा गोष्टी करता येईल. कादंबरी वा गोष्टीचे पुस्तक वाचून सुद्धा कंटाळा येऊ लागला. त्यातच एके दिवशी गावातील चांडाळ

चौकडी गुरूजी जवळ आले, काय गुरूजी काय चाललय? गुरूजी आपल्या नेहमीच्या सुरात काही नाही, बोअर होतय वाटत मध्येच नानाने आपल्या तोंडात तंबाखुची मसाला कोंबून म्हणाला. गुरूजी पत्ते खेळता येतात का? लंगड्या माधवने विचारले. गुरूजींना पत्ते खेळता येत असूनही त्यांनी नाही असे उत्तर दिले. गावात दिवाळी, नागपंचमी, होळी या सणाच्या दिवशी मित्रासोबत गुरूजी रम्मी खेळत असे. त्यामुळे पत्ते खेळणे त्याला नवीन नव्हते मात्र नौकरीच्या गावात मुळीच खेळायचे नाही असे त्यांनी पक्के ठरविले होते. रिकामा वेळ कसा घालावयाचा यावर उपाय काही सुचना आणि चांडाळ चौकडी रोज येऊन गुरूजींना तंग करू लागले. अन् एके दिवशी गुरूजींचा पाय घसरला आणि चांडाळ चौकडी सोबत पत्याचा डाव सुरू झाला. एक वा दोन तासावरचा डाव आता रात्रभर चालू लागला. पानवाल्याच्या विहीरीवर स्नान करणे हळूहळू कमी होऊ लागले. शाळेत मुलांना काही तरी काम देवून वामकुक्षी घेण्याच्या प्रकारात वाढ झाली. मित्रासोबत अधूनमधून झिंग व्हायची सवय या चांडाळ चौकटमुळे खूपच वाढली. आता सकाळी उठल्यावर चहाची जागा देशीने घेतली. दर शनिवारी गावी जाणारे गुरूजी महिना महिना घरी जाणे बंद झाले. पगार तर उरतच नव्हती शिवाय गावात उधारी वाढली. जेवण्याचे वांदे झाले. लोक कोणी जवळ येऊन देईनात शाळेतील मुले सुद्धा दूर राहू लागले. आता राधाच फक्त मला समजून घेऊ शकते म्हणून राधा, मला माफ कर असे म्हणू लागले. बाजुलाच झोपलेली राधा गुरूजीला उठवते, अहो, उठा काय झालं काही स्वप्न बघितलात काय? गुरूजी उठून बघतात तर काय हे आपल्या घरी आहेत. तेव्हाच पेपर हातात पडते. बातमी वाचून गुरूजी खदाखदा हसतात. बातमीमध्ये सभा बारगळली असा मथळा असतो.

................................

## * प्रामाणिक वसंता *

प्रामाणिकपणा मुळे वसंताचे क्लेक्टरकडून कौतुक आणि पन्नास हजार रूपयाचे पारितोषिक आजच्या सर्वच पेपर मध्ये ही बातमी झळकली. खरोखरच वसंताने कामच असे केले होते म्हणून स्वतः कलेक्टर साहेबांनी त्याचे कौतुक केले. वसंता एक ऑटो ड्रायव्हर. गरीब मात्र प्रामाणिक. त्याने कधी ही पैश्याची हाव केली नाही. ऑटो चालविताना वाहतुकीचे नियम तोडला नाही की कोठे छोटा अपघात देखील केला नाही. प्रवाश्यासोबत नेहमी प्रेमळ वागत असतो. वयोवृध्द व्यक्तिना कमी पैश्यात त्यांच्या इच्छित स्थळी सोडत असे. एक-दोन रूपयासाठी त्याने प्रवाश्यासोबत कधी घासाघीस केली नाही. प्रवाशी हेच आपले दैवत असे तो समजायचा. सकाळी आठ वाजता घरा बाहेर पडायचा आणिसायंकाळी बरोबर सहा वाजले की ऑटो आपल्या घरी त्याच्या नियमित जागेवर लावून उर्वरित वेळ आपल्या कुटुंबासोबत घालवित असे, असा त्याचा रोजचा नित्यक्रम. त्याचे कुटुंब म्हणजे बायको रकमा, मोठी मुलगी स्वरुपा आणि मुलगा दीपक, छोटा परिवार सुखी परिवार असा. ही दोन्ही मुले घराजवळील सरकारी शाळेत शिकत होती. तसे वसंता सुद्धा सरकारी शाळेतून दहावी पास झालेला होता. त्याची घरची परिस्थिती खुप हलाखीची होती. वसंताचे वडील शेतमजुरी करीत असे. स्वतः ची शेतीबाडी काही ही नव्हते. गावात राहून आपल्याने शेती किंवा शेतमजुरी करणे शक्य नाही म्हणून लग्न झाल्या झाल्या शहरात येऊन ऑटो चालविण्याचा निर्णय घेतला. सध्या त्याला बऱ्यापैकी पैसे मिळू लागले होते. त्याची पत्नी रकमा आजुबाजुच्या घरात मिळेल ते काम करून कुटुंबाला हातभार लावित असे. त्यांना एक छोटेसे घर होते. घर कसले ती तर एक झोपडीच होती. पण तरी ही ते चौघेजण त्या झोपडीमध्ये सुखी व समाधानी होते. तर अश्या छोट्याश्या झोपडीतील एका गरीब ऑटो ड्रायव्हर वसंताचे नाव पेपरमध्ये वाचताना बायको रकमा, स्वरूपा आणि दीपक यांचा आनंद तर गगनात मावेनासा झाला परंतु शेजारी-पाजारी लोकांना ही वसंताचा खुप अभिमान वाटत होता. त्याला त्याच्या प्रामाणिकपणाचे आजफळ मिळाले असे जो तो बोलू लागला आणि वसंताला ही मनोमन खुप आनंद झाला.

त्या दिवशी रोजच्या प्रमाणे सकाळी आठ वाजता घराबाहेर पडून दिवसभर ऑटो चालवून सायंकाळी सहा वाजता आपल्या नियमित जागेवर ऑटो

लावली. त्यानंतर एकदा वाकून ऑटोमध्ये सर्वत्र नजर फिरविली असता, मागील शीटच्या पाठीमागे मोकळया जागेत त्याला एक पिशवी नजरेस पडली. कोण्या तरी प्रवाश्याने ती पिशवी मागे ठेवली होती आणि उतरत असताना विसरून गेले होते. वसंताच्या डोळयासमोर दिवसभरातील प्रवाशी तरळले मात्र पिशवी कोणाची असेल? याचा काही शोध लागला नाही. लगेच वसंताने ती ऑटोमधली पिशवी उचलली आणि घरात नेली. ती पिशवी कुणाची असेल? त्या पिशवीत काय असेल? या प्रश्नाने वंसंताचे डोके काही चालत नव्हते. पिशवीत आहे तरी काय हे पहावे म्हणून पिशवी उघडून पाहिली असता त्यात दोन-चार साड्या, लहान मुलांचे एक-दोन ड्रेस आणि एक छोटी पिशवी दिसून आली. यावरून वंसंताने अंदाज बांधला की कोण्या तरी महिलेने आपल्या ऑटोमध्ये विसरली असावी. त्या छोट्या पिशवीमध्ये काय असेल या उत्सुकतेने ती पिशवी उघडली, त्या बरोबर वंसंताचे डोळे चमकुन गेले. छोट्या पिशवीत साधारणपणे पैसे असतील असा वंसंताचा अंदाज होता पण त्यात निघाले सोन्याचे दागिने. वंसंताच्या काळजाचे ठोके वाढले होते. जवळपास दहा-बारा तोळे वजन असलेल्या सोन्याचे दागिने होते. वंसंताने एवढ्या मोठ्या प्रमाणात सोने यापूर्वी एकदाही पाहिले नव्हते. त्यामुळे त्याला काळजी वाटू लागली. काय करावे हे त्याला काही सूचत नव्हते. तेवढ्यात तेथे रकमा आली. वंसंताच्या हातात दागिने पाहून ती खुप खुश झाली. पण वंसंताने जेंव्हा हे दागिने आपले नसून ते ऑटो मध्ये कुणी तरी पिशवी विसरली होती आणि त्या पिशवीमध्ये आढळले असे सांगल्यावर ती खुपच नाराज झाली. ज्याचे दागिने आहेत त्यांना परत करणे आपले कर्तव्य आहे असे वसंताने आपल्या बायकोला समजावून सांगितले. यावर रकमा नाराजीच्या सुरात म्हणाली की, ती पिशवी कुणाची आहे? त्याचा आत्ता नाही-पत्ता नाही. मग देणार कुणाला? देवाने आपणाला भेट म्हणून दिली आहे. घरात आलेल्या लक्ष्मीला असे बाहेर करू नका. असे खुप बोलली पण वंसंताचे मन काही मानत नव्हते.

वंसंता प्राथमिक शाळेत शिकत असताना एक घटना घडली. जोशी सर परिपाठमधून रोज काही ना काही चांगल्या गोष्टी सांगत असत. आज सुध्दा सरांनी सांगितले की, रस्त्यावर किंवा कुठे ही काही सापडले तर ते आपल्या आई-बाबाकडे द्यावे. शाळेत एखादी वस्तू किंवा काही सापडले तर ते शाळेच्या मुख्याध्यापकाकडे किंवा आपल्या वर्गशिक्षकाकडे द्यावे. त्यामुळे आपल्या वरील अनर्थ टळतात.

सापडलेल्या वस्तू वर आपला काही एक हक्क नसतो. मात्र तीच वस्तू आपणास संकटात नेऊ शकते. आपल्यावर चोरीचा आळ आणु शकते. म्हणून लगेच ती वस्तू मोठ्या व्यक्तीकडे किंवा जबाबदार व्यक्तीकडे सुपुर्त करावे म्हणजे मानसिक समाधान मिळेल. जोशी सरांचे बोलणे वंसंता मन लावून ऐकत होता. एके दिवशी शाळेच्या मैदानात असलेल्या हापश्यावर पाणी पिण्यासाठी गेला असता, तेथे हापश्यावर त्याला एक कंपासपेटी दिसून आली. कुणी तरी पाणी पिताना कंपासपेटी हापश्यावर ठेवली आणि तेथेच विसरली होती. वसंताने ती कंपासपेटी सरळ मुख्याध्यापकाकडे जमा केली. दुसऱ्या दिवशी परिपाठ मध्ये मुख्याध्यापकानी सर्व मुलासमोर वसंताचे जाहीर कौतुक करून कंपासपेटी ज्याची होती त्याला परत केली.

आज यानिमित्ताने वसंताला परत एकदा जोशी सरांचे जी वस्तू सापडली ती वस्तू आपली नसते ही शिकवण लक्षात आली. तसा तो जागेवरुन ताडकन उठला, पिशवी भरली आणि घराबाहेर आला. आपली ऑटो बाहेर काढली आणि सरळ पोलिस स्टेशन दिशेने जाऊ लागला. जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये वसंताने ती सापडलेली पिशवी जमा केली. तेंव्हा कुठे वसंताला समाधान वाटले. पोलिसांनी वसंताचे नाव, पत्ता आणि मोबाईल क्रमांक लिहून घेतल्यानंतर ती पिशवी आपल्या पोलिस स्टेशन मध्ये जमा केली आणि त्याची माहिती इतर पोलिस स्टेशनला कळविले. दोन-चार दिवसानंतर एक महिला दागिन्याची चौकशी करीत करीत त्या पोलिस स्टेशनमध्ये आली तेंव्हा तिचे दागिने परत मिळालेले पाहून खुप अत्यानंद झाला. ही पिशवी येथे कशी आली? याची चौकशी केली असता, तिला वसंताची माहिती तिला मिळाली. वसंताचे आभार व्यक्त करावे म्हणून तिने वसंताचा पत्ता आणि मोबाईल क्रमांक मिळविला. हां हां म्हणता ही बातमी शहरात सर्वदूर पसरली. तशी कलेक्टर साहेबांच्या कानावर देखील ही बातमी पोहोचली. तसे कलेक्टर साहेबांनी वसंताचे जाहीर कौतुक करण्याचे ठरविले. कारण समाजात अश्या प्रामाणिक लोकांची संख्या खुप कमी कमी होत चालले आहे. सामाजिक विकासासाठी आज प्रामाणिक लोकांची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणून कलेक्टर साहेबांनी वसंताचे नुसते जाहीर कौतुकच केले नाही तर पारितोषिक म्हणून पन्नास हजार रुपयाचे इनाम ही दिले. शालेय जीवनात शिकलेल्या प्रामाणिकपणा मुल्याचे फळ आज मिळाले असल्याचा आनंद वसंताच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता

## *मुलगी झाली हो... *

गावातील सगळया लोकांना पेढे वाटत रामराव मोठ्या आनंदाने बोलत सुटला"मुलगी झाली हो. . . मुलगी झाली हो. . . " लोकांनी सुद्धा तेवढ्याच आनंदात त्याचे पेढे घेत होते आणि त्याचे अभिनंदन ही करत होते. बरं झालं एकदाचं रामरावच्या घरात मुलगी आली असे लोकं एकमेकांना बोलू लागली. कारणही तसेच होते. रामरावाच्या मागील सात पिढ्यात मुलगी जन्मालाच आली नव्हती. तेव्हा रामरावला मुलींच्या या जन्माने अत्यानंद झाला परंतु त्यासाठी पाच मुले जन्माला घालावी लागली. गावात रामरावाला पांडवाचे वडील पंडू आणि त्याची पत्नी जानकी हिला पांडवांची आई कुंती या टोपणनावानेच ओळखले जायचे. आज त्यांच्या घरात मुलींच्या रूपात साक्षात लक्ष्मीच आली. मुलगी व्हावी म्हणून त्यांचा लक्ष्मीदेवीला नवस ही होता. म्हणूनच बारश्याची दिवशी साऱ्याजणी मिळून तिचे नाव लक्ष्मी असेच ठेवले. लक्ष्मीच्या येण्याने साऱ्या घरात आनंदाचे वातावरण होते. परंतु या आनंदासाठी ज्यांनी हट्ट धरला होता ती रामरावची आई मात्र नव्हती. नुकतेच चार महिन्याखाली तिची देवाज्ञा झाली. न राहवता शेजारणीने म्हणूनच टाकली लक्ष्मीच्या रूपात आई परत आपल्या घरातच आली. तळहाताच्या फोडाप्रमाणे रामराव व जानकी आपल्या मुलीची काळजी घेवू लागले. घरात ती सर्वांचीच लाडकी झाली होती. पौर्णिमेच्या चंद्रकलेप्रमाणे लक्ष्मी हळूहळू मोठी होऊ लागली. तिचे पाय फुटले तसे ती इकडे तिकडे चालू लागली. तिच्या बोबड्या बोलाने घर सर्व हरखून जात होते. बघता बघता लक्ष्मी दहा वर्षाची झाली. मुले ही मोठी झाली. घर संसाराचा व मुलांवरील खर्चामूळे रामरावाच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर उभे राहत होते. कर्जाच्या काळजापायी त्याचा चेहरा सुकून चालला होता. कर्ज कसे फेडावे याचाच तो नेहमी विचार करायचा मात्र त्याला उत्तर सापडत नव्हते. रामराव एका कंपनीत नौकरी करीत होता. जेमतेम दोन हजार रूपायाच्या तुटपुंजी पगारावर त्याची नौकरी चालू होती. रामराव तसा सोज्वळ, हुशार, मनमिळावू, आणि इतरांना सहकार्य करणारा होता. त्यामूळे कंपनीकडून दरवर्षी त्याच्या पगारात थोडी थोडी वाढ केल्या जात असे. जानकीसोबत विवाह झाला. त्यावेळी त्याच्या घरात ते दोघे आणि आई असे तिघेच जण त्यामूळे त्यांचा खर्च ही कमी व्हायचा आणि पगारीतून काही शिल्लक ही राहायचे. जानकीला पहिला मुलगा झाला त्यावेळी घरातील सर्व आनंदमय

वातावरण झाले होते. मुलाच्या येण्याने खर्च थोडा वाढला परंतु रामरावला त्याची काळजी नव्हती. जानकी दुस-यांदा जेव्हा गरोदर होती तेव्हा सगळयांना वाटले की आत्ता मुलगी व्हावी. परंतु त्यांच्या सात पिढ्यात मुलगी झालीच नाही त्यामुळे रामरावच्या मनात कुठेतरी शंकेची पाल चुकचुकत होती. अखेर तसेच झाले दुस-यांदा ही मुलगाच झाला. आपल्या पिढ्यात मुलगी होणारच नाही त्यामूळे दोघांनाही ऑपरेशन करून घ्यावं असं वाटत होतं. एक तर आपला पगार कमी आणि ना शेती ना बाडी म्हणून त्यांनी ऑपरेशन करण्याचं ठरवलं. परंतु त्याच्या आईने मात्र तीव्र विरोध केला. भावंडांना ओवाळायला एक तरी बहीण रहावी अशी तिची मनोमन ईच्छा होती. आईच्या या इच्छेमूळे त्याला काही एक करता येईना. मुलीची वाट पाहता पाहता त्याला पाच मुलेच झाली. संसाराचा खर्च दिवसेंदिवस वाढतच होता, पगारातील एकही रूपाया शिल्लक राहत नव्हता. घर आणि मुलांच्या शिक्षणावरील खर्च यामूळे तो अगदी त्रस्त झाला होता. आईच्या हट्टापायी त्याला काही सुचेना. कंपनीकडून उचललेल्या कर्जामूळे त्याला पगारसुद्धा कमी मिळत होता. त्यातच आईने अंथरूण धरले. ती आज-उद्यामध्ये जगत होती. जाता जाता तिने लक्ष्मी देवीजवळ नवस केला की या वेळेला तरी घरात मुलगी येऊ दे. हा नवस तिने आपल्या मुलाला व सुनेला सांगितले. एक-दोन महिन्यात तिची देवाज्ञा झाली आणि जानकीला परत दिवस गेले. आईनं केलेल्या नवसामूळे साक्षात लक्ष्मीच घरात आली. मुलींच्या येण्यानं सारं घर आनंदून गेले. सात पिढ्याचं ऋण या क्षणी त्यांना मिळालं होतं. मुलींच्या जन्माने तो आनंदी झाला परंतु कर्जाच्या डोंगरामूळे त्याचा चेहरा नेहमी उदास दिसायचा. मुले आता मोठी झाली. नदीचे पाणी उताराकडे वहावी तसे मोठ्या मुलांचे कपडे, दप्तर, पुस्तक, वह्या सारं काही छोट्या भावांकडे येत होती. नवीन खरेदी करायला त्यांच्याकडे तेवढा पैसा सुद्धा नव्हता. कर्ज कमी करण्यासाठी तो कंपनीत जादा काम करू लागला. मुलांच्या शिक्षणाकडे त्याचे अजिबात लक्ष नव्हते. मुलं शाळेला जात आहेत का? रोज अभ्यास करीत आहेत का? या गोष्टीकडे लक्ष द्यायला अजिबात वेळ नव्हता. प्रत्येकाचं मागणं वेगळं, कसेबसे त्यांचे दिवस सरत होते. त्या संसारात ना तो खुश होता ना त्यांची मुलं, सगळयांची नुसती परवड चालू होती. घरात एखादा सण, समारंभ साजरा करायचे म्हटले की त्याच्या काळजात धस्स करायचं. घरात खाणारी तोंड झाली जास्त आणि कमावणारा हात फक्त एक, त्यामूळे त्याच्या संसाराच्या जमाखर्चाचा हिशोब काही केल्या जुळतच नव्हता. आर्थिक दारिद्रयामुळे एकाही मुलाचं शिक्षण

पूर्ण झाले नाही. रिकामटेकडे पोरं खाऊ लागली फिरू लागली. एकानंतर एकाचे असे पाचही जणाचे लग्न झाले. शे-पाचशे रूपयांची नौकरी त्यांना कशी बशी मिळाली. ते पैसे त्यांच्याच संसाराला पुरत नव्हते तर रामरावाच्या परिवारांसाठी ते काय करतील. उलट त्याचेच खाऊन त्यालाच उलटे बोलत होती. काय दिलं आम्हाला? गरिबीच्या पलिकडे आम्हाला काही दिलेच नाही असं रोजच त्यांच्यात वाद व्हायचा. त्यांच्या अशा वादाने तो पुरता वैतागला होता. आईचं बोलणं ऐकून एवढा संसार वाढविला याचा त्याला राहून राहून पश्चाताप होत होता. दोन पोरांवर ऑपरेशन झालं असतं तर हे दिवस पहायला मिळालं नसतं असं मनोमन विचार करत होता. लक्ष्मीच्या तोंडाकडं पाहून तो सारे दु:ख विसरून जात होता.

शेवटी एके दिवशी व्हायचे तेच झाले. वाद घालून मुलांनी आपली चूल वेगळं मांडण्याचा निर्णय घेतला. डोक्यावरचे कर्ज वाढवून ते मोकळे झाले. लक्ष्मी वयात आली असतांना त्यांनी साथ सोडली, यामूळे तो अजून चिंताग्रस्त बनला होता. मुलीची कन्यादान करण्याची जबाबदारी ही शेवटी पित्याचीच. मुलीच्या लग्नाच्या काळजीत त्याला रात्रीची झोप येतनव्हती. काय करावं हे त्याला सुचेना. दिवाळी झाली. तुळशीचं लग्न झालं. त्या रात्री तो या कुशीवरून त्या कुशीवर होत होता तरी ही त्याच्या डोळयाला डोळा लागत नव्हता. राहून राहून त्याच्या मनात एकच गोष्ट मनाशी पक्की केली आणि शांत झोपी गेला. सकाळी लवकर उठला. स्नान करून चहा घेतली आणि बाहेर पडला. तास दीड तासानंतर तो परत घरी आला एका युवकाला सोबत घेवून. जानकीला चहा ठेवायला सांगितलं. लक्ष्मीची ओळख करून दिली आणि म्हणाले, “लक्ष्मी, तुला हे शिवाजी मालक म्हणून पसंद आहे का? ” लक्ष्मी लाजली आणि आत पळाली. तेव्हा जानकीनं त्याची विचारपूस केली. शिवाजी एक अनाथ मुलगा होता. कामात हुशार. रामरावच्याच कंपनीत कामाला होता. स्वभाव सुद्धा त्याच्यासारखाच. दोघाचं बोलणं पूर्वीच झालेलं होतं. अखेर लक्ष्मीनं होकार दिला. मुले तर त्यांना पोसायला तयार नव्हते म्हणूनशिवाजीला घरजावई घेण्याचा विचार पक्का झाला. त्या दोघाचं मोठ्या थाटामाटात लग्न झालं. अखेरचा सल्ला म्हणून रामरावाने जावयाला एक कानमंत्र दिला. मुलगा असो वा मुलगी दोनच्या नंतर नको रे बाबा! हम दो हमारे दो.... . यावर शिवाजी फक्त स्मित हास्य दिला आणि आपल्या सुखी संसाराला प्रारंभ केला.

## *अपेक्षाभंग *

आज सरिताच्या डोक्यात विचाराचं काहूर उठलं होतं. डोकं अगदी सुन्न झालं होतं. काय करावं आणि काय नाही याच विचारात ती तशीच झोपी गेली. तिच्यासमोर दोनच पर्याय ठेवण्यात आले होते. एक तर गुमाने संसार करणे आणि दुसरे म्हणजे श्यामरावांशी फारकत घेवून नौकरी करणे. या दोन पैकी कोणता पर्याय निवडावे याबाबत तिच्या मनात वावटळ उळलं होतं.
सरिता ही मध्यमवर्गीय कुटूंबातील सुसंस्कृत घरातील समजदार आणि हुशार मुलगी. वडील प्राथमिक शाळेत शिक्षक होते तर आई घरकाम करत होती. तिच्यापेक्षा लहान एक भाऊ असा छोटा व सुखी परिवारात वाढलेल्या सरिताला दु:खाचा लवलेश ही माहित नव्हता. आपण खुप शिकावे आणि यशस्वी जीवन जगावे असे तिला वाटत होते. मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत जीवनात असं काही बिकट प्रसंग घडेल की त्यावेळी आपणाला हे आजपर्यंत शिकलेल्या पदवी प्राप्त केलेल्या ज्ञानाचा त्याग करावं लागेल, याची साधी कल्पना सुद्धा केली नव्हती. शाळेमध्ये शिकतांना शिक्षक तिला प्रश्न विचारायचे "सरिता, तुला शिकून काय व्हायचं आहे? "तर तिचं उत्तर ठरलेले असायचे, “सर, मला शिकून डॉक्टर व्हायचं आहे आणि रूग्णांची सेवा करायची ईच्छा आहे. "खरोखरच तिची बुद्धीमत्ता सुद्धा तशीच होती. पहिल्या वर्गापासून तर नवव्या वर्गापर्यंत ती अव्वल नंबरवरच होती. साऱ्याच विषयात ती अगदी हुशार व तल्लख होती. कोणताच विषय तिला कठीण असे वाटत नव्हते. ती एक प्रेमळ, मायाळू आणि सर्वांशी मिळून मिसळून राहणारी मुलगी होती. त्यामूळे शाळेत ती सर्वांची आवडती होती. ती एका चांगल्या शाळेत शिकत होती जेथे सर्वच प्रकारचे संस्कार नकळतपणे मुलांवर करण्यात येते होते. त्यास्तव तिच्यावर खुप चांगले संस्कार झाले होते. घरात सुद्धा वातावरण अत्यंत चांगले असल्यामूळे तिला इतर काही दु:खदायक किंवा क्लेशदायक बाबींची जाणिवच नव्हती. ती मनाने धाडसी व साहसी होती. कठीण प्रसंगी स्वत:ला सावरून घेण्याची शक्ती तिला आयुष्यातील एक दोन घटनांनी दिले ज्यामूळे तिचा अपेक्षाभंग झाला. अपेक्षेप्रमाणे मॅट्रीकच्या परीक्षेत नव्वद टक्के गुण मिळवीत तीने स्वप्न पूर्ण करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले होते. बारावीच्या परीक्षेत सुद्धा अपेक्षेप्रमाणे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली. तेव्हा सर्वांनाच खुप आनंद वाटला.

आता फक्त सेट परीक्षेत चांगले गुण मिळविले तर तिचा डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण होणार होते. पण दैवाने इथेच साथ दिली नाही. दोन वेळा प्रयत्न करून सुद्धा तिला चांगले गुण मिळवता आले नाही. बी. एस्सी. किंवा बी. ए. करण्याचा अजिबात विचार नव्हता. काही जणांनी डी. एड्. करण्याचा सल्ला दिला. तो घरच्यांना पटत होता परंतु तिला पटत नव्हते. शेवटी घरी रिकामं बसण्यापेक्षा डी. एड्. केलेलं बरं म्हणून तीने तिथे प्रवेश घेतला. दिवस असे मजेत जात होते. सरिताला डॉक्टर व्हायचं स्वप्न भंग पावलं म्हणून दु:ख वाटत होतं. सोबतच शिक्षिका म्हणूनही जनतेची सेवा करता येतेच की या विचाराने तिला दिलासाही मिळत होता. ती लग्नाच्या वयाची झाली, याची जाणिव आई-वडिलांना तेव्हाच झाली होती. तिचे हात पिवळे करावे आणि मोकळं व्हावं असं आईला नेहमी वाटत होतं. तसं तीने एके दिवशी आपलं मन मोकळं केलं आणि लग्न करायचेच असं ठरविलं. परंतु सरिताने स्पष्ट नकार दिला. ती पाहुणचार म्हणजे बघण्याचा कार्यक्रम करण्यासाठी सुद्धा तयार नव्हती. परंतु आईच्या आर्जव विनंतीमूळे तयार झाली. बँकेत चांगल्या पदावर काम करणाऱ्या शामरावांनी स्वत:हून आई-वडिलांकडे गळ घातली. त्याला मुलगी पसंद होतीच फक्त औपचारिकता पूर्ण करणे बाकी होते. सरिता तशी दिसायला सुंदर होती. नाकी-डोळी छान, रंग गोरा-गोरा पान या गीताप्रमाणेच ती होती. शामरावांनी आपली पसंती "होकार" कळविली तसे घरात चलबिचल सुरू झाली तर हिच्या मनात विचाराचं काहूर उठलं. सरिताच्या मनात आत्ताच एवढ्या लवकर लग्न करायचे नव्हते. डी. एड्. पूर्ण केल्यानंतर एक-दोन वर्षे शिक्षिका म्हणून अनुभव घेऊनच लग्न करावे असा तिचा विचार होता. मात्र आई-वडिलांना वाटत होते की, यापेक्षा चांगले स्थळ मिळणार नाही. पोरीनं नशीब काढलं आई-वडिलाचे मन दुखवायचे नव्हते आणि शिक्षण ही सोडायचे नव्हते. करावे काय? अश्या दुहेरी पेचात ती पडली होती. शेवटी ती लग्नाला तयार झाली पण एका अटीवर "माझे डी. एड्. चे शिक्षण पूर्ण करू देत असाल तरच मी लग्न करेन" अशी गळ शामरावांसमोर टाकली. यात शामरावांना काही अडचण जाणवली नाही. डी. एड्. चा अर्धा वर्ष तर सरला आत्ता राहिले दीड वर्ष. . लगेच शामरावांनी होकार भरला आणि तुळशीचे लग्न लागले की सरिता व शामराव यांचा विवाह सोहळा मोठ्या धुमधडाक्यात संपन्न झाला. ती नववधू सासरी आली. बघता बघता दिवाळी सुट्टया संपल्या. दिवस कसे सरले हे दोघांनाही कळाले नाही. उद्या डी. एड्. चे कॉलेज सुरू होणार त्याच्या आदल्या रात्री शामराव

व सरिता यांच्यात पहाटपर्यंत चर्चा रंगली. शामराव म्हणत होते, “जाऊ दे ना, काय डी. एड्. , बी. एड्. लावलीस? माझा पगार काय कमी आहे का? ”यावर सरिता आपल्या निर्णयावर ठाम राहिली, डी. एड्. पूर्ण करणार म्हणजे करणारच! लग्नाच्या अगोदर माझी अट काय होती? माहित आहे ना! “शामराव एक पाऊल मागे घेतले आणि तिचा मार्ग मोकळा झाला. लढाई जिंकल्याच्या तोऱ्यात ती कॉलेजात जाऊ लागली. सुरूवातीचे काही दिवस मजेत गेले कारण सरिता घरीच राहत होती. परंतुआता तिचा कॉलेज सुरू झाल्यापासून त्या दोघांत रोजच कुरबुर चालू झाली. पहाटे उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत दोघांमध्ये नेहमी वाद-वाद होऊ लागले. तिची कॉलेजला जायचा वेळ आणि शामरावांचा बँकेत जायचा वेळ एकच त्यामूळे सकाळची भरपूर घाई असायची. शामराव पुरूषी रूबाबात तिला ऑर्डर द्यायचा आणि ती स्वयंपाक घरातून जोरजोरात बोलायची. सायंकाळी शामराव “मूड” मध्ये असायचा परंतु कॉलेजातली स्वाध्याय, गृहपाठ, पाठाची तयारी यामध्ये ती गुंग असायची. कधी कधी तो वाट पाहून वाट पाहून झोपी जायचा मात्र ती गृहपाठ पूर्ण केल्याशिवाय झोपायची नाही. या अशा वागण्यामूळे तो पूरता त्रस्थ झाला होता. कधी एकदा तीचं डी. एड्. पूर्ण होते असं त्याला वाटू लागायचं. त्यातच शासनाने सहा महिने आंतरवासिता करण्याचा नियम काढला तेव्हा तर शामरावाचे अजून सहा महिन्याचा वनवास वाढल्यासारखे वाटले. तिची आंतरवासिता कालावधी संपतो न संपतो निकाल ही लागला आणि ती प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली. तेव्हा दोघांनाही खुप आनंद झाला. तिला चांगले गुण मिळाल्यामुळे तिला जिल्हा परिषदेचा शिक्षिकेच्या नौकरीचा कॉल आला. ती कॉल लेटर पाहून आनंदाने नाचू लागली होती. तिची मनोमन खुप ईच्छा होती की आपण ही नौकरी करावी. ही संधी सोडू नये. तिचा स्वप्न साकार होणार असे वाटत असतांना शामराव मात्र या नौकरीच्या विरोधात होता. नौकरी करून काय करणार? माझा पगार आपल्या संसारासाठी पुरेसे नाही का? मी तुला डी. एड्. चे शिक्षण पूर्ण करून देण्याचे वचन दिलो होतो मात्र नौकरीचं वचन तर दिलो नव्हतो ना!तू जर नौकरी करू लागलीस तर जे दोन वर्ष आपण दु:ख अनुभवले ते आयुष्यभर अनुभवणार का? सर्वप्रथम आपण ठरवायचे की, आपणाला पैसा हवा आहे की, मानसिक सुख. याउपरही तू आपल्या निर्णयावर ठाम राहत असशील तर तुझयासमोर एकच पर्याय तू माझयापासून फारकत घे आणि खुशाल नौकरी कर. याच विचारात रात्रभर तिला झोप लागली नाही. काय करावं सुचेना शाळेत

शिकतांना तिच्या अपेक्षा खुप मोठ्या होत्या. परंतु आज त्या शिक्षणामूळे तिला संसार तोडायची पाळी येते की काय असे वाटत होते. काही अशी शामरावाचे तिला योग्य वाटत होते, की पैसा कमावून मनाला समाधान नसेल तर तो पैसा काय कामाचा? यापेक्षा घर सांभाळून सुखी राहण्यात काय वाईट आहे!आपल्या जवळ असलेल्या ज्ञानाचा वापर शाळेत करता आले नाही म्हणून काय झालं स्वत:चे संसार सुखी करण्यासाठी या ज्ञानाचा वापर करता येत नाही काय? मनात पक्का विचार करून अंथरूणातून उठली संसार या पर्यायावर टीक मार्क करून शामरावांना गरमा गरम चहा दिला. लगेच जेवणाचा डबा दिला. शामराव समाधानाने बँकेत गेले. सरिता आपल्या सर्व अपेक्षांचा त्याग करून झोक्यावर बसून रेडिओ सुरू केली त्यात "जिंदगी का सफर है, ये कैसा सफर कोई समझा नहीं, कोई जाना नहीं" हे गाणे चालू होते.

.................................

# *हरवलेले डोळे *

शालेय जीवन संपले न् संपले अन् कॉलेजच्या वेगळया दुनियेत मन रमून गेलं. गावापासून जवळपास पन्नास कि. मी. वर जिल्ह्याच्या ठिकाणी कॉलेज जवळच रेल्वेस्थानक असल्यामुळे रोज रेल्वेचा प्रवास ठरलेलाच. रोज सकाळी लोकलने जाणे आणि लोकलने येण्याचा नित्यक्रम. त्यामुळे रेल्वेत बऱ्याच लोकांशी संबंध यायचा; परंतु तेवढ्याच गाडीतल्या डब्यापुरते. मी विज्ञान शाखेचा विद्यार्थी असल्यामुळे खुप अभ्यास करणे आणि आपले ठरवलेले ध्येय गाठणे एवढेच माझे लक्ष्य होते. त्यामुळे रेल्वेत मिळालेल्या फावल्या वेळेचा सदुपयोग करताना पुस्तकातील महत्वाच्या ओळी अधोरेखित करून घरी त्याची टिपण तयार करायची. तारूण्य आणि कॉलेजचे जीवन हे दोन्ही पण एकमेकांच्या हातात हात घालून येतात. त्यामुळे कॉलेजातील मुलांकडे समाज एका वेगळया नजरेतून पाहत असतो. कॉलेजची पोरं म्हणजे शिकणे कमी आणि पोरीच्या मागे धावणे जास्त. योग्य त्या वयात योग्य ते कार्य वयाला साजेशी करणे यालाच तर प्र. के. अत्रे यांनी जीवन म्हटले आहे. म्हातारपणी प्रेम करणे जमत नाही तसे तारूण्यात शहाणपणाच्या गोष्टी समाजाला रूचत नाही. खूप शहाणा झालास हे वाक्य हमखास ऐकायला मिळते. जर तारूण्यात शहाणपणा दाखवला तर ! प्रत्येक मुलगा तरूण मुलगी दिसली की शायनिंग मारतो, आपल्याकडे आकर्षित करून घेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतो. हा त्याचा दोष नसून तो तारूण्याचा आहे. तसे आमचे मित्रमंडळी रेल्वेत एखादं पाखरू (कॉलेज विश्वात सुंदर मुलींना पाखरू म्हणत) दिसते का? म्हणून प्रत्येक पाखरू असेल त्या ठिकाणी घुटमळत राहात. मला सोबत नेण्याचा त्यांचा हेका रोजच असे. मात्र माझे उत्तर ठरलेले “तुम्ही शोधून या तोवर मी येथेच बसतो” पुस्तकी कीडा म्हणून डिवचत सारे मित्र पाखराच्या शोधार्थ डबा न् डबा फिरत असत. दिवस मजेत जात होते. हळूहळू अंतिम परीक्षेची तारीख जवळ येत चालली तसा एकाकी होऊ लागलो. सराव परीक्षा सुरू झाली. त्या दिवशी गणिताचा दुसरा पेपर होता. मला तो विषय कठीण असल्यामुळे सोबत आणलेले नोटस् काढून रेल्वेत चाळत बसलो. त्या डब्यात अनेक वेगवेगळया प्रकारचे लोक होते. सर्वांवर एक नजर टाकली आणि अभ्यासाला लागलो. माझ्या अगदी समोर एक पडदानशीन महिला होती. तिचे फक्त डोळे तेवढे दिसत होते. तिच्या

आजुबाजूला कदातिच तिचे आई-वडील बसले होते. पंधरा-वीस मिनिटांच्या प्रवासानंतर मी एकटक त्या महिलेकडे पाहिलं. तिच्या डोळयात मला करूणा, कीव जाणवली. तेव्हा तिच्या आजुबाजूला बसलेल्या दोघांचे निरीक्षण केले असता ते दोघे कदाचित मुस्लिम धर्मीय जाणवत होते. परीक्षा असल्यामुळे ते सर्व विचार बाजूला सारून परत अभ्यासाकडे डोळे वळविले;पण का? कोण जाणे? वाचनात लक्षच लागत नव्हते. परत एकदा त्या महिलेकडे पाहिले तेव्हा तिचे डोळे अश्रुंनी पाणावलेले दिसले. ती का रडत होती? तिचे ते दोघे खरेच आई-वडील किंवा नातलग असतील काय? अशा नाना शंका मनात आल्या; पण करावे तरी काय? विचार करता करता माझं कॉलेजचं स्टेशन आलं. तसं त्या गावात ते तिघेपण उतरले. परीक्षेची वेळ जवळ येत होती. यांचा पाठलाग करावा तर परीक्षा बुडेल! त्यांच्यामागे मागे ऑटो स्टँण्डपर्यंत गेलो; परंतु ते कोठे चालले याचा पत्ता लागला नाही. ती ऑटो भुर्रकन निघून गेली. मी तसाच त्या पाणावलेल्या डोळयांचा विचार करीत कॉलेजकडे चालू लागलो. त्या दिवशी परीक्षेचा पेपर जेमतेम गेला. परीक्षा लवकर संपल्यामुळे सायंकाळच्या ऐवजी दुपारच्या गाडीने निघालो. मनाने हताश झालेलो. स्टेशनवर आलो आणि मनातील मरगळ दूर करण्यासाठी डबे फिरू लागलो. या डब्यातुन त्या डब्यात फेरफटका मारताना त्या पडदानशीन सोबत असलेले ते दोघे मला दिसले; परंतु त्यांच्यासोबत ते डोळे दिसले नाहीत. आता मात्र माझं मन संशयाच्या खाईत पडलं. काय केलं असेल या दोघांनी तिच्यासोबत. हे जर आई-वडील किंवा नातलग असतील तर तिच्या डोळयांत अश्रु का आले? त्याच तंद्रीत माझं गाव आलं, मी उतरलो. गाडी दोन शिट्या वाजवून निघून गेली. मी मात्र एकसारखा त्या धावत्या गाडीकडे पाहत राहिलो. मी त्या असहाय महिलेला मदत करू शकलो नाही याची खंत मला वाटत राहिली. एकन्एक दिवस ते हरवलेले डोळे मिळतील काय? या प्रतीक्षेत अजूनही रेल्वेचा प्रवास नित्य नियमाने लोकल टू लोकल करीत आहे.

................................

## *साहस *

सातव्या वर्गात शिकत असतानाच सुधाचे लग्न मोठ्या थाटामाटात झालं. अजून तिला खूप काही शिकायच होत, तसं आईला तिने बोलूनही दाखवलं, परंतु बाबांच्या रागासमोर दोघांचेही चालले नाही पाच सात एकर जमीन, मोठा वाडा, गोठ्यात दहा-पंधरा जनावरं, एकुलता एक मुलगा अश्या पोरासोबत सुधानं नशीबचं काढलं प्रत्येक जण बोलत होते. परंतु सुधाला शाळा सोडावी असं वाटत नव्हती. शाळेत ती एक हुशार, चुणचुणीत व गोड मुलगी होती परंतु तिच्या मनाने काही करायला तिला संधी कोठे होती? सुधाचे सासरीचे दिवस नवीन लुगडी नेसण्यात व गोडधोड खाण्यात मजेत होते. काही दिवस आनंदात उलटले एके दिवशी सायंकाळी स्वयंपाक आटोपून ती आपल्या यजमानाची वाट पाहत बसली. वाट बघता बघता ती तशीच झोपी गेली. मध्यरात्री केव्हातरी दारावरच्या टकटक आवाजाने ती उठली दार काढले तर तिचे पतीदेव दारू पिवून तर्रर्र होवून आला होता. जेवायचे तर होशच नव्हते. तसेच ते दोघे झोपी गेले. सुधाच्या नशिबात आता हे रोजचे होते. नवऱ्याच्या विक्षीप्त वागण्याने सुधा पुरती कंटाळली. अशातच तिला दिवस गेले. सासरी-माहेरी सर्वांना खूपच आनंद वाटले. सासू सुधाला नेहमी म्हणायची, बाई, वंशाचा दिव्याला जन्म दे. वयाच्या सोळाव्या वर्षी सुधा माता बनली. तिला मुलगी जन्मल्यामुळे सासरचे मंडळी तर पहायला सुद्धा आले नाही. मुलगी जन्माला दिल्यामुळे सासू, सासरे, नवरा सर्वच मंडळी तिला खूप हिणवू लागले. मानसिक व शारीरिक त्रासामुळे सुधा मनातून खूपच खंगू लागली. लहान वयात माता बनल्यामुळे प्रसूती वेळी खूप रक्तस्त्राव झाला होता आणि बाळाची वाढ ही चांगली झाली नव्हती. त्यामुळे सुधा व तिची मुलगी दोघेही कृश आणि सदा आजारी पडत होते. त्यातच दीड एक वर्षाने सुधाला परत दिवस गेले. सासूबाईंनी तिला चेकअप साठी दवाखान्यात घेऊन गेली. तिच्या उदरात परत मुलगी आहे म्हणून तिचे गर्भ मोकळे करून घरी निघाले. असे तिच्यासोबत दोन तीन वेळा घडलं. वंशाचा दिवा पाहिजे या हट्टापायी तिचं गर्भपात करण्यात आलं. त्यामुळे दिवसेंदिवस तिची शक्ती कमी कमी होत गेली. ती आत्ता निरशक्त व बेढव दिसू लागली. तसं सासू व नवऱ्याच्या मनात दुसरं लग्नाचा विचार घोळू लागलं.

एके दिवशी अचानक सासूबाईंनी सुधाच्या सवतीला घरात आणलं. ही बातमी सुधाच्या आई वडीलांना कळाली तसे ते धावत पळत आले. भांड भांड भांडले तेव्हा सासूबाईने घेऊन जा, आपल्या मुलीला घरी, असा निर्वाणीचा इशारा दिला. परंतु ते गरीब घराचे, एकदा बाहेर पडलं तर तिला परत त्या घरात प्रवेश मिळणार नाही, या धास्तीने ते आपला काळजाचा तुकडा तिथेच संकटात सोडून निघून गेले. सुधाचा अतोनात छळ सुरूच होता. जीवन जगण्याच्या सर्व आशा-आकांक्षा संपुष्टात आले होते. सुधाची आई शेजारी पाजा-यांना तिची करूण कहानी सांगत रोज रडत होती. काय करावं तिला कळेना सुधाची एकप्रकारे ती परीक्षाच होती. तो दिवस तिच्यासाठी सुवर्ण दिवस होता. एका वकिलांच्या भाषणाने तिच्या अंगात सुप्त साहस जागे झाले. त्या वकिलाने अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मार्ग सुचविले होते. त्या मार्गाचा अवलंब करण्यासाठी तिला आई वडील आणि शेजारी पाजा-यांनी धीर दिलं. त्या दिवशी ती सासरच्या सर्व मंडळीसोबत वाद घालून, मी परत येईन परंतु तुम्हाला सजा देण्यासाठी, म्हणून ती अर्ध जग जिंकल्याच्या अविर्भावात माहेरी निघाली. आज ती मनात ठाम निर्धार केली होती की, मी थांबवलेल शिक्षण पुढे चालू करणार आणि यांना धडा शिकविणार. दहावीची परीक्षा खासगी विद्यार्थी म्हणून बसली आणि पास झाली. त्यानंतर तालुक्याच्या गटविकास अधिका-यांना भेटून बचत गटाची स्थापना केली. त्या गटाअंतर्गत भेटून बचत गटाची स्थापना केली. त्या गटाअंतर्गत चार पाच शिलाई मशीन घेऊन ती माहेरी शिवणकाम करू लागली आणि इतर मुलींना शिकवू लागली. बघता-बघता तिच्याकडे संपत्तीचा ओघ सुरू झाला. आई-वडिलांना सुधा ही ओझं न वाटता आधारवड वाटत होतं. कोर्टात सुधाने बायको जिवंत असताना दुसरी बायको केली, म्हणून कोर्टात केस दाखल केली. तेव्हा सासरच्या मंडळीच्या कोर्ट कचेऱ्या वाढतच होता. सून म्हणून नातलगातली आणलेली पोरगी काही दिवसातच निघून गेली. पोराच्या रोजच्या दारूनं पाच सात एकर जमीन काही गुंठ्यावर आलं तर गोठ्यात दहा-पंधरा जनावराच्या जागी कुत्र्याची दहा-पंधरा पिलं राहत होती. सासरची मंडळी आज रस्त्यावर आली होती. त्यांचे दिवस फिरले होते.

सुधाला सासरी परत बोलावून नेण्यासाठी ती सर्व मंडळी खूप मनधरणी केले परंतु सुधाचा विचार पक्का होता. मी माझ्या मुलीवर तुमची सावली पडू

देणार नाही. मी परत एक सुधा निर्माण होऊ देणार नाही. असे म्हणून ती सर्वांना हाकलून दिलं आणि कोर्टातून आपल्या नवऱ्यापासून फारकत मिळवलं. आज सुधा आणि तिची मुलगी सुखाने नांदत आहेत. कायद्याच्या आधारासोबत सुधाने केलेल्या साहसामुळे तिला पुनर्जन्म मिळाला होता. समाजामध्ये अशा अनेक सुधा आजही सासू, सासरे, नवरा यांचा हकनाक बळी पडतात. जीवनात आपली मुलगी सुधा बनू नये असे वाटत असल्यास तिला खूप शिकवा. शिक्षणामुळे मनुष्याला ज्ञान प्राप्ती होते आणि संकटाला तोंड देण्याचे साहस, बळ निर्माण होते.

...............................

## *संघर्ष *

आज सुनंदाच्या डोळयात आनंदाचे अश्रू तरळत होते. तिचा एकूलता एक मुलगा सुनील नौकरीसाठी मुंबईला चालला होता. अतिशय कठीण परिस्थितीत सुनीलने आपले कॉम्प्युटर इंलिनिअरींग कोर्स पूर्ण केला होता. कॅम्पस इंटरव्ह्यू मधूनच त्याला टाटा कंपनीने नौकरीसाठी कॉल पाठविला होता. देवगिरी एक्सप्रेसमध्ये बसून सुनील जाऊ लागला तसे सुनंदाला अश्रू आवरणे कठीण झाले होते. साऱ्या गावकऱ्यासह तिला सुद्धा आपल्या मुलाचा अभिमान वाटत होता. ज्या कारणांसाठी तिचा नवरा हे जग सोडून गेला त्यांचे स्वप्न साकार केल्याचा अभिमान तिला होत होता. सुनंदा ही मध्सयवर्गीयातली मुलगी. दिसायला सुंदर जरी नसली तरी नाक सरळ आणि थोडीशी बुटकी त्यामूळे प्रत्येकाच्या नजरेत भरत होती. पाहुण्यातल्याच रमेश सोबत तिची सोयरीक झाली. रमेश काही तिला परका नव्हता. तो सुद्धा गणितात हुशार विद्यार्थी. कितीही अवघड गणित रमेश चुटकी सरशी सोडवीत असे. थोडासा भेळा परंतु मितभाषी रमेश आपला जास्तीत जास्त वेळ पुस्तक वाचण्यात घालवित असे म्हणून त्याला सारे पुस्तकी किडा म्हणून चिडवीत असे. त्यांची आजी त्याला "अरे रम्या, पुस्तकं वाचून वाचून वेडा होशील रे" म्हणून समजावित. बारावीच्या परीक्षेत चांगले मार्क मिळाले मात्र इंजिनिअरींग साठी थोडे कमी पडले. पेमेंट सीटवर प्रवेश मिळाला असता परंतु तेवढा पैसा घरदार विकून ही जमा झाले नसते. म्हणून सरळ बी. एस्सी. चा पर्याय स्विकारला आणि चांगल्या टक्केवारीत पदवी मिळविली. पदवीचा निकाल आणि लग्नाची तारिख एकच निघाली. पदवी आणि लग्न दोन्ही एकदाच. त्यामूळे घरातील सर्वांनाच अत्यानंद झाला. एक-दोन कॉम्पूटरचे चांगले कोर्स शिकून रमेश नौकरीसाठी या कंपनीतून त्या कंपनीत चकरा मारीत होता परंतु त्याला नौकरी काही मिळत नव्हती. संसरात त्याचे काही मन लागत नव्हते. त्यातच सुनंदाला दिवस गेले आणि छान हसरा बाळ सुनिल त्यांच्या जीवनात आला. दिवसेंदिवस संसाराचा खर्च वाढतच होता, रमेशला काही नौकरी मिळत नव्हती. दिवसभर शहरात फिरून फिरून यायचा आणि रात्री पुस्तकं चाळत बसायचा. त्याच्या जवळ विद्वता होती, प्रमाणपत्र होतं, नव्हतं काय तर वशिला. असेच एका कंपनीत

मुलाखतीला गेल्यानंतर रमेशने साऱ्याच प्रश्नांची उत्तरे दिली. परंतु त्यांनी रमेशला निवडले नाही. तेव्हा रमेशला खूप राग आला आणि त्याने कंपनीच्या मॅनेजरचे कॉलर धरून ओढले. लगेच तेथे पोलिस बोलाविण्यात आले रमेशला लॉक अप मध्ये टाकले. ही वार्ता थोड्याच वेळात गावात पोहोचली. गावातली प्रतिष्ठित मंडळी येऊन सात-बाऱ्यावर त्याची सुटका केली. तेव्हापासून चार दिवस तो घराच्या बाहेर पडला नाही. त्याचा मनावरचा ताबा सुटला होता. तो घरातल्या लोकांवर चिडचिड करू लागला. विनाकारण सुनंदाला शिव्याशाप देत मारू लागला. एवढेच नाही तर घरासमोरून जाणाऱ्या – येणाऱ्या लोकांना काही बोलू लागला. रमेश आता पुरता वेडा झाला होता. सुनंदाला काय करावे कळत नव्हते. तिला तर धड रडताही येत नव्हतं. गावातल्याच चार शहाण्या लोकांनी रमेशला पुण्याच्या मेंटल दवाखान्यात सोडण्याचा सल्ला दिला. पुण्याला अनेक वेडे ठीक झाल्याची सुनंदा पण ऐकून होती. मग एके दिवशी रमेशला पुण्यात नेण्यात आलं.

सुनंदाला घर खायला आल्यासारखं वाटत होतं. ती पण बारावी पास होती परंतु नौकरीच्या मागे ती कधी धावली नाही. परंतु गावचा सरपंच खूप चांगला देवमाणूस होता म्हणून गावातल्या अंगणवाडीवर शिक्षिका म्हणून तिची नेमणूक केली. महिना शे-पाचशे रू. तेवढाच कुटुंबाला आधार होता. सुनील दहा वर्षाचा झाला. महिना दोन महिन्यांनी दवाखान्यातून पत्र येतच होती खुशालीची. कसेबसे कुढत कुढत दहा वर्ष संपले. दवाखान्याच्या प्रमुखांनी रमेश बरा झाला आहे, त्यास परत नेवू शकता असे पत्र पाठविल्यामूळे तब्बल दहा वर्षांनी रमेशला गावात आणलं. आत्ता तो सामान्य दिसत होता. अगोदरच मितभाषी त्यामूळे कोणाला ही जास्त बोलतच नव्हता. बस म्हटलं की बसायचं आणि कंटाळा आला की पांघरून घेऊन झोपायचा. राहून राहून आजीने बोललं वाक्य आठवायचा आणि डोळ्यात पाणी आणायचा. मनात कसलेही विचार न आणता त्याची दिनचर्या चालू होती. गावातल्या कुजबुज कुजबुज बोलण्यामूळे रमेश मात्र अस्वस्थ व्हायचा. रात्र सरून जायची पण याला काही झोप यायची नाही. सरपंचाचं आणि बाईचं ट्युनिंग लई मस्त हाय, त्यात नवरा पागल हाय, तिनं तरी काय करील बिच्चारी, ती बी शेवटी बाईमाणूस हाय, किती म्हणून सोसलं? या अश्या बोलण्यामूळे रमेशचा माथा ठणकत होतं. अंगणवाडी शिक्षिका म्हणजे मिटींगला जावेच लागते. त्यामूळे कधी वेळ होते, मग रमेशच्या मनात शंकेची पाल चुकचुकायला लागली. लोकं म्हणत्यात

ते सारं खरं आहे असं त्याला वाटू लागलं. त्याच्या मनात विचाराचं वादळ उठलं. त्यादिवशी असेच सुनंदा मिटींगला गेली होती आणि सुनील शाळेला. घरात कोणी नाही हे पाहून रमेशने एन्ड्रीनचा डबा घेतला, घटाघटा घश्याखाली ओतला आणि चिरनिद्रेत झोपी गेला. सायंकाळच्या सुमारास सुनंदा घरी आली. एन्ड्रीनचा डबा पाहताच तिच्या काळजात धस्स केलं आणि ती धाय मोकलून रडू लागली. ज्याच्यासाठी एवढी मरमर करू लागली तोच हात सोडून निघून गेला म्हणून रडू लागली. रमेशच्या जाण्याने तिचा जीव कश्यातच लागेना. तेव्हा पुन्हा एकदा सरपंचानेच तिला आधार दिला. परंतु सुनंदाच्या कानावर या सर्व गोष्टी पोहोचल्या होत्या. यापुढे सरपंचाचा आधार घ्यायचे नाही असे ठरविले. सरपंच खरोखरच देवमाणूस होता. त्याच्या मनात जरासुद्धा वासना नव्हती. पण लोकांचे तोंड कसे बंद करणार? घरात पैसा नसल्यामूळे सुनीलचं पुढील शिक्षण खोळंबू लागलं होतं. महिन्याच्या पगारीवर घर चालविणे अवघड होतं. काय करावं हे तिला ही कळेना. सगळ्या गावाला आपलं संबंध कळावे या हेतूने सरपंचाने मारोतीच्या पारावर सर्व लोकांसमक्ष नारळी पौर्णिमेच्या दिवशी सुनंदाच्या हातून राखी बांधून घेतली तेव्हा कुजबुज कुजबुज करणाऱ्या लोकांच्या तोंडात माती पडल्यासारखं झालं. संकटात सापडलेल्या माणसाला मदत करणं हीच माणूसकी आहे. यापुढील सुनीलच्या शिक्षणासाठीचा पूर्ण खर्च मी, त्याचा मामा उचलणार असे म्हणून सरपंचानी मारोती रायाच्या पाया पडला आणि घरी आणला. आज सुनंदाच्या मनात काही नव्हतं की लोकांच्या मनात, सुनीलच्या शिक्षणाचं प्रश्न ही सुटला होता. दहावीचा निकाल लागला. सुनील चांगल्या गुणांनी पास झाला. त्याच्या वडिलांचे सर्वच्या सर्व गुण सुनीलच्या अंगात होता. बाराव्या वर्गात कॉम्प्यूटर सायन्स घेऊन नव्वद टक्के मिळविला. या दोन वर्षात सरपंचांनी त्याचा राहण्याचा, खाण्याचा, वह्या, पुस्तकांचा सारा खर्च उचलला होता. पुण्याच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात कॉम्प्यूटर इंजिनियरींगला नंबर लागल्यावर सारे गावकरी, सरपंच आणि सुनंदा यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. सुनील खूप अभ्यास करीत दरवर्षी चांगले गुण मिळवीत प्रगती करत होता. त्याचं शेवटचं वर्ष चालू होतं. अचानक एके दिवशी सरपंचाला झटका आलं आणि ते सर्वांना सोडून गेले. सरपंच गेल्याचं निरोप सुनीलला कळविण्यात आलं परंतु त्याच दिवशी टाटा कंपनीची कॅम्पस इंटरव्यू होती. एक मन म्हणत होतं ज्यांनी संपूर्ण आयुष्य तुझयासाठी झटलं त्याचं शेवटचं एकदा तोंड बघून ये. तर दुसरं मन म्हणत

होतं की, सरपंचानं तुला कश्यापायी एवढं शिकवलं. हातात आलेली नौकरी सोडून गेलास तर सरपंचाच्या आत्म्याला काय वाटलं? शेवटी सुनील तेथील इंटरव्यू संपवून दुसऱ्या दिवशी गावी परतला. गाव पूर्ण सुनं सुनं वाटत होतं. सुनंदा तर सुनीलला बिलगून लहान मुलासारखी रडत होती. ज्या सरपंचावर संपूर्ण गाव कुजबुजत होतं त्याच सरपंचाच्या जाण्याने गाव पूर्ण दु:खी होतं. सुनील महिनाभर गावीच थांबला होता. त्याची कॅम्पस इंटरव्यू झाली हे सुद्धा तो विसरला होता. परंतु टपालाने गावी आलेल्या नौकरीच्या कॉलने सर्वांना पुन्हा एकदा आनंदाच्या वातावरणात हरखून टाकलं. छोट्याश्या गावातला गरीब घरातला सुनील राजधानी मुंबईत नौकरी करणार या विचाराने सर्वांना अभिमान वाटत होता. सुनील आणि सुनंदा मनोमन सरपंचाचे आठवण करीत होते. तर गावातले लोक मिळालेल्या नौकरीला सुनंदाच्या संघर्षाचे फळ मानत होते.

................................

# सुंदर

त्याचं नाव सुंदर, तसं त्याचं कामही सुंदर त्याप्रमाणेच मन ही सुंदरच होतं. परंतु सारेच जण त्याला बंदर म्हणायचे. कारण ही तसेच होते, मूळात तो दिसायचा आफ्रिका देशातील निग्रो लोकांसारखा एकदम काळाकुट्ट, अगदी बारीक नाक आणि गरगरीत लहान डोळे गालात खोल गेल्यासारखे. त्याला पाहताक्षणीच वाटायचे हा बंदर म्हणजे माकडच आहे. त्यामूळे गावातील सर्व पोरं सोरं त्याला बंदर. . . बंदर म्हणून डिवचायचे. याप्रकारामूळे त्याचं मन त्याला रोज खात असे आणि देवाने मला असे रूप का दिले म्हणून देवाच्या नावाने बोटे मोडायचा. त्याच्या त्या कुरूपामूळे कोणी त्याला जवळ येऊ देत नव्हते, मैत्री करीत नव्हते ना त्याला खेळू देत होते. त्यामूळे त्याला कोणी मित्र, सखा वा दोस्त नव्हताच मुळी. घर-परिवारात आणि नातलगात सुद्धा त्याला चिडवले जायचे त्यामूळे तो जीवनाला पुरता कंटाळला होता. मात्र त्याची आई त्या कुरूप सुंदर मुलांवर जिवापाड प्रेम करायची. त्याच्या मनात न्यूनगंड निर्माण होऊ नये यासाठी सदैव ती त्याला चांगल्या गोष्टी सांगून त्याच्यात विश्वास निर्माण करीत असे. आपणाला मिळालेले रूप हे निसर्गाची देणगी आहे, त्यावर आपण काही करू शकत नाही. निसर्गाने कोकिळेला काळा रंग दिला म्हणून लोकं त्या पक्ष्याला हिणवत नाहीत परंतु त्याच्या मंजूळ आवाजाने वेडेपीसे होतात. रूपाने सुंदर दिसण्यापेक्षा मनाने आणि आपल्या कर्माने सुंदर होण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी चांगली कामे करीत जा, मोठ्यांच्या आज्ञा पाळत जा, दीन दलित दुबळया अपंग लोकांना मदत करीत राहा, खूप अभ्यास करून जीवनात यशस्वी हो आणि आपली कीर्ती दुरवर पसरवून टाक, मग बघ एके दिवशी हे सारेच लोक तुला खरोखरच सुंदर म्हणतील. अशी समजूत ती रोजच काढीत असे. आईच्या या शिकवणीमूळे लोकांचे बोलणे तो निमूटपणे ऐकायचा. नळी फुंकिले सोनारे, इकडून तिकडे वाहे वारे प्रमाणे लोकांचे चिडवणे ऐकायचा आणि सोडून द्यायचा. लहानांपासून मोठ्यांचे सगळयाचे काम तो निस्वार्थ भावाने करीत असे त्यामूळे प्रत्येकांच्या -हदयात तो स्थान मिळविला होता. आई सोबत त्याचे जीवन मस्त आनंदात, मजेत जात होते. गावातील प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्याला जवळच्या

शहरात जाणे भाग होते. गावापासून चार कोसावर असलेल्या शाळेत प्रवेश घेतला आणि शहरातच एक खोली घेऊन आईविना राहण्याचा निर्धार केला. आज त्याच्यासोबत प्रेमळ आई नव्हती परंतु तिची शिकवण मात्र मनात साठवून होती. शहरातही त्याला गावांप्रमाणेच अनुभव येत होता. पांढरपेशांची ती गोरी गोमटी मुलं सुंदरला जास्तच त्रास देवू लागली. शाळेच्या पहिल्या दिवशी सुद्धा विद्यार्थ्यांसह शिक्षक मंडळी सुद्धा त्याची टर उडविली. परंतु तो न डगमगता आईची शिकवण मनात ठेवून तेथे राहू लागला. हळूहळू सुंदरचे नाव सर्व शाळेत गाजू लागले ते त्याच्या सुसंस्कारित वागण्यामूळे व सुंदर रेखीव अक्षरामूळे. अभ्यासातही तो हुशार होता त्यामूळे लवकरच सर्व शिक्षकांचा लाडका शिष्य बनला. जो तो त्याच्याशी मैत्री करण्यासाठी हात पुढे करीत होता. तो सर्वांचाच चांगला मित्र बनला. गल्लीमध्ये सुद्धा आपल्या वर्तनाने तो साऱ्याचेच मन जिंकला होता. कोणतेही लहान-सहान कामे जसे भाजीपाला आणणे, दुध आणणे, वृत्तपत्र आणणे, कपडे इस्त्री करून आणणे, धान्य दळून आणणे इ. कामे करून गल्लीतल्या सगळयाच लोकांच्या गळयातील ताईत बनला होता. आपली कामं करून घेण्यासाठी सारेच लोक त्याला प्रेमाणे "सुंदर. . . . सुंदर" म्हणत होती. लोकं आपणाला असेच बोलावावे म्हणून तो सगळयांची कामे आवडीने करायचा. दहावी, बारावी आणि पदवीचे शिक्षण यशस्वी रित्या पूर्ण करून त्याने पत्राकारिता हे क्षेत्र निवडले. शालेय जीवनापासून मातृभाषा मराठीवर त्याचे विलक्षण प्रेम होते. कविता लिहिण्याचा त्याचा छंदच मुळी त्याला या क्षेत्राकडे नेले. आपले शिक्षण पूर्ण करून तो एका दैनिकांत वृत्तसंकलनाच्या कामाला लागला. पाच-सात वर्षात त्याने अनेक कविता रचल्या आणि विविध दैनिक, साप्ताहिक, मासिकांतून प्रकाशित झाले. अनुभवावर रचलेल्या कविता त्याच्या नावाप्रमाणे खुपच सुंदर होते. जिल्ह्यात त्याचे नाव सर्वदूर पसरले. काही वाचकांनी त्याला अभिनंदन पर पत्र पाठविले तेव्हा त्याला अजून हुरूप आला. आपल्या कल्पक बुद्धमत्तेतून त्याने अनेक कविता तयार केल्या. दैनिकांत काम करीत असल्यामूळे प्रकाशकांशी त्याचा जवळचा संबंध येऊ लागला. एका प्रकाशकाने त्याच्या कविता पुस्तक रूपात तयार करण्याचा मनोदय व्यक्त केला आणि लागलीच त्याने त्यास होकार दिला. "सुंदर आई" नावाचा जीवनातला पहिला कविता संग्रह प्रकाशित झाला तसे त्याचे नाव संपूर्ण राज्यात पसरले. त्यानंतर त्याने अनेक कविता संग्रहाचे पुस्तक प्रकाशित करीत खूप मोठा व्यक्ती झाला. परंतु त्या दैनिकांतील नौकरी सोडली नाही.

दैनिकांच्या मालकाने सुंदरवर विश्वास दाखवित त्यास उपसंपादक व त्यानंतर संपादकाची जबाबदारी दिली. आईची शिकवण उराशी बाळगून तो रोज मोठा होत होता परंतु तो सामान्यांसारखाच राहून आपलं अस्तित्व टिकवीत होता. आज त्याची कीर्ती सर्वदूर पसरली होती आणि अर्थातच एवढा कुरूप असूनही त्यास सर्वच जण “सुंदर. . . सुंदर” असेच म्हणत होती. .

# व्यसन

आज सगळं गाव दु:खात बुडालं होत. हळहळ व्यक्त होत होती. बापाच्या सरणाला पोराने विस्तू लावण्याऐवजी आज पोराच्या सरणाला बाप विस्तू लावीत होता हे चित्र गावातील लोकांना देखवत नव्हते. परंतु काळासमोर कोणाचे चालते, जे व्हायचं ते होऊनच राहते. अखेर आबा पाटलांच्या मुलाने पहाटे पहाटे झोपेतच दम तोडला. वर्षभर खाटल्यावरच होता, आज जाईल कि उद्या याचा काही नेम नव्हता. माणसाला झटपट करण यावं, असं तडपून तडपून मरण येवू नये अशी चर्चा गावातल्या लोकांत जास्त पाप केलं की कुत्र्यासारखचं मरण येते हे भाविक मंडळीचे म्हणणे. पण त्या वेळेला आबा पाटलांच्या डोक्यात काय विचार चालले असतील? ते स्वत:लाच दोष देत होते. माझ्यामुळेच. . . . . फक्त माझ्या या वागण्यामूळे, व्यसनामूळे माझ्या मुलाचा जीव गेला. मी विचार करून वागलो असतो, तर ही वेळ माझ्यावर नक्कीच आली नसती असा विचार करून आबा पाटील लहान मुलांसारखे ओक्साबोक्सी रडू लागले. धनुष्यातून निघालेला बाण आणि मागे पडलेली वेळ ही कधीच परत येत नसते. आबाजी रावसाहेब पाटील हे नुसते पाटीलच नव्हते तर त्या गावचे वीस वर्षे ते सरपंच होते. त्यामूळे ते बोलतील ती पूर्व दिशा, त्याच्या डोळयाला डोळा सुद्धा भिडवायची कोणाची हिम्मत नव्हती. पंचवीस-तीस एकर जमीन, चार पाच सालगडी शेतात काम करायला, चार-पाच बायका घरकाम सांभाळायला. पाच पन्नास लोकांच्या पत्रावळया रोजच उठत होते. देवाने त्यांना काही कमी केलं नव्हतं परंतु लग्न होऊन पाच वर्षे झाले तरी मूल होईना. तेव्हा मोठ्या महादेवाला पाटलीन बाईंनी नवस केला तेव्हा शिवरात्रीला शंभू महादेवच घरी जन्मला. त्या दिवशी पाटलांना ही खूप आनंद झाला. सगळया गावाला पाटलांनी गोड जेवण दिलं. अख्या पंचक्रोशीत पाटलांचा दबदबा होता म्हणून खूप लोक आली. सगळीकडे आनंदी आनंद, पाटलांनी त्याचं नाव संभाजी ठेवलं परंतु

सगळं गाव त्यांना शंभू पाटील म्हणूनच हाक मारीत होते. गोरापान, काळेभोर केस, गरगरीत डोळे, असा शंभू पौर्णिमेच्या चंद्रासारखा मोठा होऊ लागला. पाटलाचा एकुलता एक नवसाचा मुलगा त्यामूळे प्रत्येकजण तळहाताच्या फोडासारखं जपत होते. पाटील तर त्यास “संभाजी राजे” म्हणून हाक मारीत. सदान् कदा पाटलांच्या मांडीवरच बसायचा, पाटला सोबत उठायचा अन् त्यांच्यासोबतच झोपायचा. पाटलाचा मुलगा म्हणून कोणी त्यांच्यासोबत भांडण करायचे नाही मग शंभू पाटील जसे म्हणतील तसे ती पोरं करायची. दिवसा मागे दिवस जाऊ लागले. शंभु लहानाचा मोठा झाला. त्याच्या हेकाटीपणामूळे पोरं त्याच्यासोबत खेळेनाशी झाली. शंभू आला की ते दुसरीकडे जाऊ लागली. त्याला कोणी मित्र करून घेण्यास तयार नाहीत. रडका चेहरा करीत तो आबा पाटलाकडे जात आणि या मुलांची तक्रारी करीत. मग आबा पाटील रागात काही तरी बोलून त्याला तेथेच बसवीत. चार-पाच लोक गोल वर्तुळात बसलेली, त्यांच्या हातात बदकाची रंगीत पानं, त्याच्यात होणारी चर्चा ही शंभू पाटलाला नित्याची झाली होती. करमणूक व्हावी आणि वेळ निघावा यासाठी पाटलाचे काही हौशी मित्र रोजच पत्ते खेळायला यायचे आणि दिवसभर त्यांचा डाव चालू राहायचा. शंभू पाटील रोजच आबाजवळ बसून बारीक निरीक्षण करायचा. हळूहळू शंभूला जोकर पासून राणी व गुलाम पर्यंतची पाने कळायला लागली. रंगजमणी खेळता खेळता त्यास चुकत माकत रम्मी सुद्धा जमू लागली. असेच एके दिवशी आबा पाटलांच्या हातात रमी होती परंतु त्यांनी पान फेकणार एवढ्यात शंभू म्हणाला, “बाबा, रम्मी झाली, तुम्ही पान का फेकता? ”म्हणत त्याने आबाच्या हातातील पत्ते जुळवून रम्मी करून दाखविली तेव्हा आबा पाटील त्याच्या पाठीत शाबासकी देत “व्वा रे संभाजी राजे, आज तुम्ही माझे पाचशे रूपये वाचविलेत. ”शंभूला सुद्धा त्या शाबासकीने खूप बरे वाटले. आत्ता रोजच शंभू आणि आबा एकत्रित विचार करीत रम्मी खेळू लागले. आबांना रोज सायंकाळी घोटभर औषध (शंभूला हे दारू नसुन माझं झोपेचं औषध आहे असे ते नेहमी सांगत) घेतल्याशिवाय झोपच येत नसे. औषध घेतलं की बाबा मस्त झोपतात हे शंभू रोजच पाहत असे. गावात जिथपर्यंत शाळा होती ती

पूर्ण झाली. आपल्या पोराला खूप शिकवायचं म्हणून त्याला तालुक्याच्या ठिकाणी ठेवण्यात आलं. गावात सगळयाचा लाडका असलेला शंभू शहरात कोणाचा काय लागतो? सातवीपर्यंतचे शिक्षण त्याचे असे तसेच झाले. त्यामूळे त्याचे शाळेत मन लागत नव्हते ना अभ्यासात. सदा न् कदा तो चिंताग्रस्त. त्याची चिंता दूर करण्यासाठी तशीच काही मुले त्याचे मित्र बनले. त्याची मैत्री गाढ झाली. ती सर्व मंडळी शाळेत कमी आणि खोलीवर जास्त राहू लागली. अभ्यासाच्या नावाने बोंबाबोंब, दिवसभर ही पोरं पत्ते कुटू लागली. शंभूनी सर्वांना रम्मी कसे खेळतात हे शिकवलं मग त्याची बैठक वाढतच गेली. बाबाचं औषध काय असतं हे इथल्या मित्राकडून कळालं. कधी रात्री झोप न आल्यास तो सुद्धा औषध घेऊ लागला. शंभूकडे पैश्याची काही कमी नव्हती आणि आबाकडे मुलांच्या अभ्यासात लक्ष देण्यास वेळ नव्हता. शंभू काय करतो? याकडे जरा सुद्धा लक्ष न देता पैसे मागितले की त्यापेक्षा जास्त पैसा त्याच्या हातात देऊन पाटील मोकळे. शंभू कॉलेजात जाऊ लागला तसा तो अजून स्वैर बनला. बार मध्ये जाणे, धाब्यात खाणे आणि क्लबात जाणे ही नित्याची बाब झाली. यात कधी कधी तो वाईट मित्राच्या संगतीमूळे बाईकडे वळला. जसे त्याचे बाईकडे पाय वळले तसे ते पाय पुन्हा परत आलेच नाहीत. व्यसनामूळे शंभू आत्ता पूर्ण वाया गेला होता ही बाब आबा पाटलांना कळाली तसं आबाचं काळीज फाटलं. शंभूला लगेच गावी बोलावून घेण्यात आलं. बिघडलेल्या पोराला वळणावर आणण्यास लग्नाच्या बेडीत अडकविण्याचा विचार करून आबा पाटील त्याची सोयरीक बाजूच्या माधवराव पाटलांच्या मुलीशी जुळवलं. संभाजीचं लग्न मोठ्या थटामाटात झालं. आबांना वाटलं की, पोरगं आता पटरीवर येईल आणि सर्व काही सुरळीत होईल. शहरात शाही, मौजमजेत राहिलेल्या शंभूला हे जीवन पिंजऱ्यात राहिल्यासारखे वाटत होते. बाहेरची मजा चाखलेला शंभू बायकोला समजून घेतला नाही. तिच्यासोबत रोजच हिडीस–फिडीस त्यामूळे घरात अशांतता दिसत होती. त्या दिवशी रात्रीचे जेवण आटोपून सर्व आपापल्या अंथरूणावर अंग टेकले होते. तेवढ्यात शंभूच्या खोलीतून मोठ्याने रडण्याचा आवाज आला. आबासह सर्व लोक

धावले. शंभू चक्कर येऊन पलंगाजवळ पडला होता. आबांनी लगेच गाडी काढली आणि सर्वजण तालुक्याच्या ठिकाणी दवाखान्यात नेलं. डॉक्टरांनी नाडी तपासून आज रात्री येथेच मुक्काम करण्यास सांगून काही औषधं दिली. थोड्या वेळानंतर शंभूला जाग आली, त्याला बरे वाटू लागले परंतु डॉक्टरांना भेटल्याशिवाय जायचे नाही असं आबांनी ठरवलं. सकाळ झाली. डॉक्टर दहाच्या सुमारास दवाखान्यात आले. त्यांनी सर्वप्रथम याच शंभूकडे आले परत नाडी तपासली आणि रक्त व लघवी तपासण्यासाठी पाठविले. आबांच्या चेहऱ्यावर चिंतेची एक रेघ स्पष्ट दिसत होती. डॉक्टरांना त्यांनी मनात भिती बाळगत विचारले सुद्धा “काय झालं असेल, डॉक्टर? ” “रिपोर्ट आल्याशिवाय मी काही सांगु शकत नाही” असे डॉक्टर म्हणाले. थोड्याच वेळात लघवी व रक्ताचे रिपोर्ट आले. डॉक्टरांनी रिपोर्ट वाचल्यानंतर आबाला एका बाजूला बोलावले आणि शंभूला एड्स झाले असल्याची माहिती दिली. आबाचं काळीज ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन जमिनीवर पडले. परंतु ही बाब आबांनी कोणासही सांगितले नाही. काही तरी कारण सांगून अंगाची हळद ही निघाली नाही त्या मुलीसोबत फारकत केलं. शंभूला महारोग झाल्याची कल्पना गावाला झाली परंतु त्यास एड्स म्हणतात हे आबांनी त्यांना जाणू दिलं नाही. दिवसामागं दिवस सरू लागले तसा शंभू अजून बारीक होऊ लागला, खोकला वाढतच राहिला. अखेर त्या दिवशी पहाटे पहाटेच आबाच्या मांडीवर डोकं ठेवून शंभू शांत झोपी गेला. त्याचा जीव व्यसनानेच घेतला परंतु व्यसनाची मूळ सवय घरातून मिळाली याची बोच अजूनही आबाच्या मनात सलत होती.

# डिजिटल शाळा

शिरपुर शाळेतील मुख्याध्यापक, दोन शिक्षक आणि एक मैडम आज सकाळी सकाळी गावात आले होते. तशी तर शाळा सकाळी नऊ वाजता भरते पण आज सर्व जण सकाळी का आले असतील म्हणून गोविंदराव म्हणतात, "रामराम गुरूजी" आज खूप लवकर आलात, काय काम काढले? " यावर मुख्याध्यापक म्हणाले, "काही नाही हो, आपली शाळा डिजिटल करायची आहे. त्यासाठी गावातील लोकांची मदत घ्यावी म्हणून वर्गणी गोळा करण्यासाठी आलो आहोत. " "बरे, बरे" असे म्हणत गोविंदराव हळूच बाजूला झाले. तेवढ्यात शाळा व्यस्थापन समितिचे अध्यक्ष आणि इतर मंडळी आले. मग सर्वांनी मिळून गावात फेरफटका मारण्यासाठी निघाले.

शिरपुर हे जेमतेम शंभर घराचे आणि एक हजार लोकसंख्या असलेले गाव. दोन गावात मिळून असलेली गटग्रामपंचायत आणि दोन्ही गावात सरकारी शाळा अस्तित्वात होत्या. पण शिरपुरच्या शाळेत मुलांची संख्या बऱ्यापैकी असल्यामुळे शिक्षकांची संख्या चार होती. गावातील सर्व लोक खूप चांगल्या स्वभावाचे होते. कुणी ही शाळेच्या मुख्याध्यापक किंवा शिक्षकांविषयी ब्र काढत नसत कारण शिक्षक मंडळी सुध्दा आपले काम अगदी नेटाने करीत होते. तालुक्यातील सर्व शाळा जवळपास डिजिटल झाले होते. काही शाळा शिल्लक होत्या त्यात शिरपुरची शाळा ही होती. सर्व अधिकारी मंडळी शाळा डिजिटल करण्यासाठी मुख्याध्यापकांच्या मागे हात धुवून लागले होते. त्यामुळे नाईलाजास्तव मुख्याध्यापकास शाळा डिजिटल करण्यासाठी गावात पाऊल ठेवावे लागले. सर्वप्रथम शाळेतील शिक्षक मंडळी आपल्या पगारीतून डिजिटल शाळे साठी काही रक्कम दिले. पण डिजिटल शाळेसाठी जो खर्च येणार होता तो खूप होता, त्यासाठी ही मदत खूपच कमी होती. शासनस्तरावरुन तर काहीच मिळतनव्हते. काही ही करा पण शाळा डिजिटल करा, असा तगादा मात्र सतत लावले जात होते. ग्रामपंचायत कडून देखील काही निधी मिळणार होता पण कधी मिळणार हे नक्की नव्हते.

सर्वप्रथम गावातील प्रसिध्द व्यक्ती म्हणून ज्यांची ख्याती होती अश्या नारायणरावाच्या घरी पोहोचले. डिजिटल शाळेविषयी संपूर्ण माहिती दिली. त्यांनी सर्व बाबी नीट समजून घेऊन लगेच हजार रूपये काढून दिले. वर्गणी गोळा करण्याची सुरुवात अगदी छान झाली होती. तेथून ही फौज श्यामरावाच्या घरी पोहोचली. शाळेच्या प्रगतीसाठी श्यामरावांना अनुकूल होते त्यामुळे त्यांनी क्षणाचा विचार न करता हजार रुपये काढून दिले. सर्वाना आनंद वाटला. दोन घरात भेट देण्यामध्ये सकाळचे नऊ वाजले. शाळा भरण्याची वेळ झाली म्हणून सर्व जण शाळेत आले. शाळेत येऊन वर्गानी विषयी चर्चा करण्यात आली. असे गावात फिरून वर्गानी जमा करणे खूप कठिण काम आहे त्या ऐवजी शाळेत पालक सभा बोलवू या आणि मग वर्गणी जमा करू या. असे सर्वानी मिळून ठरविले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता जमा होण्याचे ठरवून सगळे आपआपल्या कामाला निघून गेले.

शाळेत उद्या सकाळी पालकसभा आयोजित करण्यात आली म्हणून गावात राम्या ने डंगोरीही दिली. प्रत्येक घराच्या जवळ जाऊन राम्या ने ओरडून सांगितले. सूर्य नारायण वर येण्याच्या अगोदर शाळेचे मुख्यध्यापक शिक्षक शाळेत हजर झाले. सकाळचे सात वाजले असतील, शाळेच्या आजूबाजूला असलेल्या घरातील गावकरी आपली सकाळची दिनचर्या करण्यात व्यस्त होते. कुणी दात घासत होते, कुणी तोंड धूत होते तर कुणी टमरेल धरून बाहेर जात होते. बायका शाळेतील हाफश्या वर पाणी भरण्यासाठी ये जा करीत होत्या. एक तासाचा अवधी संपला पण शाळेच्या मैदानात कुणी फिरकले नाहीत. आज पालकसभा आपल्या फायद्याची नसून आपल्या खिशाला चाट लावणारी आहे या विचारात प्रत्येकजण दुरुन चोरुन चोरुन पाहत होते मात्र जवळ कुणी येत नव्हते. जेमतेम चार पाच माणसे गोळा झाली. तेवढ्यात लोकंसमोर मुख्याध्यापकानी डिजिटल शाळेविषयी माहिती सांगितली. तेंव्हा त्या सभेत बसलेल्या पैकी एक दोघांनी सकारात्मक विचाराने शाळेला एक हजार रूपये देणगी दिली. लाख रूपयाच्या वर खर्चाचा अंदाज असताना हातात होते इन मिन वीसहजार रूपये काय करावे हे मुख्याध्यापक आणि शिक्षकांना सुचेना.
दिवस रात्र त्याच विचारांच्या धुंदीत एप्रिल महिना संपला. एक मे च्या दिवशी महाराष्ट्र दिना निमित्त झेंडावंदन झाले. यावेळी सुद्धा गावकऱ्याची जेमतेम

उपस्थिती होती. डिजिटल शाळेचा मुद्दा कोणी उपस्थित केलाच नाही. मे महिन्यात सर्वत्र बदलीचे वारे वाहत होते. यात एका महिला शिक्षिकेची आणि मुख्याध्यापकाची बदली झाली.

मुख्याध्यापकानी सुटकेचा जसा निःश्वास सोडला तसे गावकरी देखील निश्चिंत झाले होते. मात्र बच्चे कंपनी खुपच हिरमुसली झाली. अशावेळी त्यांनी जर बाजूच्या गावात असलेल्या डिजिटल शाळेत प्रवेश घेण्याचे ठरविले तर त्यात त्यांचा काय दोष?

# शिक्षणाची ज्योत

सुरेश जेमतेम १४ वर्षाचा पोरगा. घरात कुणी ही शिकलेले नव्हते त्यामुळे शाळेत कुणी पाऊल ठेवले नाही. म्हणून सुरेश देखील शाळेत गेलाच नाही. त्याला शिक्षणाचा अजिबात गंध नव्हता. गावातील चार-पाच गायी-म्हशी घेऊन तो रोज जंगलात जात असे. त्याबदल्यात त्याला महिन्याकाठी काही रुपये मिळत होते आणि तेच रुपये त्यांच्या कुटुंबाला आधार होत असे. त्याच्या घरात आई-बाबा, दोन भाऊ, दोन बहिणी आणि एक म्हातारी आजी असे आठ जणाचा परिवार होता. घरातील सर्वच जण मिळेल ते काम करून कुटुंबाला हातभार लावण्याचे काम करीत होते. घरात फक्त म्हातारी आजी राहायची जिचा सुरेश वर फार जीव होता. शिक्षण म्हणजे काय असते त्यांच्या घरात कोणाला माहितच नव्हते. घरातील सर्वच्या सर्व अक्षरशत्रू होते. सुरेशला शाळेत पाठवायाची त्याची बहिण मायाची खुप ईच्छा होती. मात्र घरात तिचे कोण ऐकणार? तिला थोडी फार शिक्षणाची आवड होती कारण तिची एक मैत्रिण शितल शाळेत शिकत होती आणि अधुन मधून तिची रंगबिरंगी पुस्तके पाहून तिला ही शिक्षणाचा मोह जडला होता. पण तिच्या समोर काही पर्याय नव्हता. कारण तिचा बाप, जो की स्वतः अडाणी तर होताच शिवाय रोज सायंकाळी दारू पिऊनच घरी यायचा. घरच्या लेकरांशी तो कधी दोन शब्द बोलून माहित नाही की प्रेमाने जवळ घेऊन माहित नाही. घरात आपल्या बायकोला तेवढा तो बोलायचा. धिप्पाड शरीरयष्टी आणि नेहमी लाल बूंद डोळे त्यामुळे कोणी मुले त्याच्या जवळ फिरकायाची नाहीत. तो सकाळी घरा बाहेर पडला की सायंकाळीच उशिरा घरी परत यायचा. त्यामुळे बापाची आणि लेकरांची भेट व्हायचीच नाही. सुरेश बापाला खुप भीत होता त्यामुळे खुले आम त्याला बोलताही येत नव्हते. शाळेत जाण्याची गोष्ट त्याने आपल्या रखमा आजी जवळ बोलून दाखविली आणि बापा कडून परवानगी काढण्याची लाडीगोडी लावली. पेरणीचे दिवस चालू होते, पाऊस एकदा पडून दडून बसला होता. सर्वांना शेतातील पेरलेली बी वाया जाते की काय अशी काळजी वाटू लागली होती. तशी काळजी सुरेशच्या बापाला ही होती. त्याच चिंतेत असताना आजीने हळूच सुरेशच्या शाळेत जाण्याचा विषय काढली.

"अरे, बाब्या, आपला सुऱ्या साळत जातु म्हणतु या, कोणा लेकराले साळा शिकू दिलं नाही, निदान याले तरी शिकू दे की . . . . . . "

त्याने रागात एक नजर आईकडे फिरविली आणि जवळ जवळ ओरडलाच" शिकून काय करणार हाय? कलेक्टर होणार हाय की डॉक्टर . . ? आपल्या बाजुचा राम्या किती शिकला, 15 पुस्तक, आणि आज काय करतो गाव भर नुसता फिरतो कान कापल्या कुत्र्यावाणी. तो श्यामराव पाटील त्यांचा मुलगा किशनराव, मोठ्या शहरात शिकला, आत्ता काय करतो माहित हाय ना. शिकायला किती खर्च येतो माहित हाय काय? म्हणे शिकू द्या . . "

आजी थोडा वेळ गप्प झाली आणि पुन्हा म्हणाली, " अरं तसे नव्ह, शिकून नोकरी लागावी असे काही नाही, शिकल्याने माणूस शहाणा होतो असे लोक म्हणत्यात . . . "

यावर तो रागात म्हणाला, " मग मला का शिकवल नाही तू सांग ना. "

अर बाबा तेव्हा साळा नव्हतं की काही नव्हतं कुठून तुला शिकवणार? जाऊ दिलास तर जाऊ दे त्याला. आत्ता तो दहा वर्षाचा झालाय. शाळेत भी घेतेत की नाही काय माहित. "

त्याचा राग शांत झाला होता. त्याच्या कुठल्या तरी कोपऱ्यात दया माया नावाची वस्तू शिल्लक होती. म्हणून मानेने होकार देऊन सुरेश ला शाळेत जाण्याची परवानगी देऊन टाकली. सूर्य उगवला, सूर्या सोबत सुरेश देखील उठला. आपल्या आजीजवळ गेला, लाडी-गोडीने रात्री काय झाले हे विचारू लागला. "आजी, काय झालं? बाबा जा म्हणले का शाळेला? " आजीने सुरेश ची थोडी वेळ मजा घेतली. पण शाळेला जाण्याची परवानागी दिली असल्याच सांगितल्या बरोबर टूणकन उडी मारुन ही गोड बातमी सांगायला आपल्या बहिणीजवळ गेला. ही बातमी ऐकून तिला ही खुप आनंद झाला. तिने लगेच त्याला गरम पाण्याने स्वच्छ आंघोळ घातली आणि स्वच्छ कपडे घालून त्याला घेऊन शाळेकडे निघाली. शाळेत सर्वत्र पक्ष्याच्या आवाजाप्रमाणे चिवचिवाट चालू होता. शाळेत गेल्याबरोबर सुरेशला मनातून खुप आनंद होत होता. रोज ईथे खेळायला मिळेल याचा त्याला आनंद वाटत होता. दोन वर्गाची शाळा आणि एकच गुरूजी. शाळेचे सर्व काही साठे गुरुजीं बघत असतात. गुरुजीं फारच शिस्तीचे आणि कडक स्वभावाचे. त्यांना अस्वच्छता अजिबात आवडत नसे. सर्वत्र सुंदर आणि टापटिप असलेले त्यांना आवडत असे. शाळेतील मुले देखील अशीच स्वच्छ आणि

टापटिपपणे शाळेत यावी असा त्यांचा अट्टाहास.
शितल सुरेशला घेऊन साठे गुरुजींच्या समोर गेली आणि म्हणाली, " गुरुजीं, माझ्या भावाला शाळेत यायचे आहे, त्याचे नाव टाका" साठे गुरुजींनी एक वार सुरेश कडे पाहिल, लठ्ठच्या लठ्ठ आणि चांगली चार फुट उंच वाढलेला, त्याला पाहून गुरुजीं म्हणाले, "किती वय आहे याच? "

"मला काही माहित नाही असेल सात आठ वर्षाचा"
"मला वाटत नाही तो सात आठ वर्षाचा तो नक्की दहा वर्षाचा असेल"
"असू द्या की मग टाका याचे नाव तुमच्या शाळेत"
"नाही जमणार, दहा वर्षाच्या पोराला आम्ही पहिलीमध्ये नाव टाकत नाही. तू त्याला घेऊन जा. एवढं मोठा पोरगा तो, कुणाला मारुन काढला तर काय करावे? नाही जमणार त्याचे नाव टाकायला, घेऊन जा त्याला. "
माया ने खुप विनंती केली पण साठे गुरुजीं काही ऐकले नाही. सुरेशला घेऊन नाईलाजने ती घरी परत आली. शाळेत घडलेली कहाणी आजीला सांगितली. ती पण नाराज झाली. सुरेशचे सांत्वन केल. सायंकाळी बाबा घरी आल्या वर आजीने शाळेतील कहाणी सांगितली तेंव्हा बाबा म्हणाले, " जे झाल ते बर झाल, उद्या लक्ष्मण पाटलाकडे पाठवितो त्याला. गुर राखयाला कोणी पाहिजे म्हणाला होता. "

दुसऱ्या दिवशी सकाळी बाबा सुरेशला लक्ष्मण पाटलाच्या घरी घेऊन गेला आणि सोबत गुराचा ताबा दिला आणि म्हणाला, " जा घेऊन जंगलात आणि सायंकाळी दिस मावळायला तेंव्हा घेऊन ये"
अशी चार वर्षे उलटली तो गुर राखत होता. पण त्याच्या जीवनात वयाच्या १४ व्या वर्षी नशीब घेऊन आली.

शाळेत बोरे गुरुजीं नावाचे शिक्षक नव्याने दाखल झाले होते. साठे गुरुजींना आता थोडा आधार मिळाला होता. जवळच्या भाटे गावाहुन ते ये जा करू लागले होते. भाटेगांव ते शाळा जेमतेम पाच किमी चा रस्ता. तो ही शेता शेता मधून. म्हणून चालत जाण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याच रस्त्यावर सुरेश गुरे चारत असताना रोज भेटायाचा. रोज त्याच्याशी गप्पा चालायाचे. बोरे गुरुजींला त्याचा स्वभाव खुप आवडला. रोजच्या बोलण्या तून गुरुजींनी त्याची पूर्ण माहिती काढली. सुरेशला शिक्षणाची गोडी आहे हे सुद्धा गुरुजींच्या लक्षात आले. एके दिवशी

सुरेशची परीक्षा पाहण्यासाठी गुरुजींने रोजच्या ठिकाणी पाच रूपयाची नोट जमीनीवर ठेवून पुढे जाऊ लागले. दुरवर उभे असलेल्या सुरेशची नजर त्या नोट वर गेली. लगेच तो पळत पुढे आला, ती नोट उचलली आणि गुरुजींना मोठ्याने हाक दिली, " गुरुजीं, थांबा, तुमची ही नोट घेऊन जा" गुरुजी आपल्या जागेवर थांबले. सुरेश धावत येऊन त्यांची नोट त्यांना परत केली. गुरुजींना समाधान वाटले. ते म्हणाले, " सुरेश, तू माझ्या परीक्षेत पास झालास, तुझी परीक्षा पाहण्यासाठी मीच ती नोट तिथे ठेवली होती. बोल तुला बक्शीस मध्ये काय पाहिजे? " यावर सुरेश थोडा वेळ विचार केला आणि म्हणाला, " गुरुजी, मला शाळा शिकू द्या, बस्स मला एवढंच पाहिजे "
गुरुजीं त्याच्या बोलण्या ने विचारात पडले आणि हे शक्य नाही असे सांगितले. आता दररोज सुरेश गुरुजीना एकच प्रश्न विचारायचा. त्यांना कळेना की काय करावे. गुरुजींच्या या समस्येची सुटका रात्रीच्या शाळेने केली. शासनाने नुकताच एक आदेश काढला की, गावातील निरक्षर लोकांना शिकविण्यासाठी रात्रीच्या वेळी एक तास शिकवणी घेण्यात यावे. या आदेशामुळे बोरे गुरुजींना खुप आनंद झाला. त्यांच्या मनात आले की यामुळे सुरेशची शिक्षणाची ईच्छा पूर्ण होईल. पण गावात मुक्काम करावा लागणार होता. बोरे गुरुजीं समोर मुख्य समस्या म्हणजे त्यांना स्वयंपाक करता येत नव्हता. त्या दिवशी दोघांची भेट झाली. गुरुजींने सुरेशला रात्रीच्या शाळेची बातमी सांगितली तेव्हा त्याला खुप आनंद झाला. गुरुजींनी लगेच दूसरी बातमी सांगितली की, त्यांना गावात रहावे लागणार आणि स्वयंपाक येत नाही. यावर सुरेश म्हणाला, त्यात काय एवढं, मी देतो ना खायला. गुरुजींना बर वाटल. पण किती दिवस खाणार? चला काही तरी होईल? म्हणून गुरुजीं त्या दिवशी आपल्या घरी गेले. दुसऱ्यां दिवशी सर्व सामानासह निघाले. रस्त्यात सुरेशची भेट झाली. आपल्या साथीदारला गुरे पहायला सांगुन सुरेशने गुरुजीं डोक्यावरील सर्व सामान आपल्या डोक्यावर घेतल आणि त्यांच्या घरापर्यंत पोहोचविल. आजपासून शिकायला मिळणार या खुशीत सुरेश नाचू लागला. सायंकाळी गुरे घेऊन पाटलाच्या घरी आला आणि लगबगीने आपल्या घरी येऊन तोंड, हात, पाय धुवून लगेच गुरुजींच्या घराकडे पळ काढला. गुरुजी आपले सामान लावण्यात व्यस्त होते. सुरेशने देखील सामान लावण्यात मदत केली. यात सायंकाळचे सात वाजले. गुरुजींना सडकुन भूक लागली होती. सुरेशने मनोमन हे ओळखल आणि धावत घरी आला. आईला गोड बोलून तीन भाकरी, भाजी घेऊन

पळाला. दोघांनी मिळून जेवण केले. जेवताना गुरुजी अधुन मधून सुरेशच्या चेहऱ्याकडे पाहत होते. विलक्षण आनंद त्याच्या चेहऱ्यावर झळकत होता. बोलत बोलत जेवण उरकले. आज सुरेशच्या अक्षर लेखानाचा श्रीगणेशा करायचा होता. गुरुजींने आपल्या पिशवीतून खापराची पाटी आणि पेंसिल काढली. सुरेशच्या हातात दिली. आणि त्या रात्री पासून सुरेशच्या शाळेला सुरुवात झाली. सुरेश जंगलात जाताना देखील पाटी-पेंसिल सोबत ठेवू लागला. दुपारच्या वेळी हमखास अक्षरे गिरवु लागला. अगदी थोड्याच दिवसात सुरेश सर्व अक्षरे आणि अंक ओळखू लागला. रात्रीच्या शाळेला इतर ही मुले होती मात्र सुरेशची प्रगती वेगात चालू होती कारण त्याच्या मनात शिकण्याची तीव्र ईच्छा होती. सहा महिन्यात सुरेश चांगल्या प्रकारे वाचू आणि लिहू लागला. गणितामध्ये तर तो खुपच हुशार होता. बोटे मोजुन पटापट गणित सोडवू लागला. त्याची ही प्रगती पाहून गुरुजींनी त्याला चौथीच्या बोर्ड परिक्षेला बसविण्याचा निर्णय घेतला. सुरेशने बोर्डाची परीक्षा दिली. त्याला त्याचा खुप आनंद वाटत होता. दोन महिन्यांनी बोर्डाचा निकाल लागला आणि सुरेश त्यात बढती मध्ये का होईना पास झाला. सुरेशला जेवढा आनंद झाला त्या पेक्षा किती तरी जास्त पटीने गुरुजींना आनंद झाला होता. आत्ता पुढील लक्ष होते सातवी बोर्डाची परीक्षा.

सुरेश मेहनत घ्यायला तयार होता आणि गुरुजी शिकवायला. त्यामुळे काही समस्या नव्हती. एका वर्षात तीन वर्षाचे अभ्यास करून परीक्षा द्यायची होती. जरा अवघड होते मात्र सुरेशने मनावर घेतल होत. मिळेल त्या वेळी पुस्तक वाचून, लिहून तो अभ्यास करू लागला. सातवी बोर्डाची परीक्षा देखील तो चांगल्या गुणाने पास झाला. तेंव्हा त्याने संपूर्ण गावात साखर वाटली. सगळयांनी सुरेशच्या अभ्यासाचे कौतुक केल. सातवी पास झाल्या मुळे त्याला आठव्या वर्गात प्रवेश मिळाला पण गावा पासून पाच किमी दूर असलेल्या गावात. कुठे रहावे काय खावे हा प्रश्न सतावित होता. त्याची सोडवणुक गुरुजींनी केली. सुरेश आत्ता गुरुजींच्या घरी राहणार होता आणि त्यांच्याच घरी जेवणार होता. बाबाच्या काना वर ही गोष्ट सांगितली तेंव्हा तो भडकला, गुरे कोण राखणार हा प्रश्न होता. मात्र गुरुजींनी समजावून सांगितले की सुरेशची बुध्दी खुप छान आहे त्याला शिकू द्या.

गुरुजींच बोलणे ऐकून बाबानी त्याला परवानगी दिली. तीन वर्षात चांगला अभ्यास करून तो दहावी बोर्डाच्या परीक्षेत प्रथम श्रेणीमध्ये पास झाला.

सुरेशचे गुणपत्रक पाहून गुरुजींच्या डोळयात अश्रु उभे राहिले. चांगल्या मार्कामुळे सुरेशला डी-एडला सहज प्रवेश मिळाला. दोन वर्षात तो ही अभ्यासक्रम पास झाला.

सुरेश आपल्या गावी परत आला. असेच उन्हाळयाचे दिवस होते. सर्वत्र उन्हाचा पारा चढला होता. सुरेशचे घर शोधत पोस्टमन घरी आला. त्याच्या हातात कसले तरी पत्र देऊन त्याची सही घेऊन निघुन गेला. त्याने तो लिफाफा फोडला. पत्र वाचताना त्याच्या डोळयातुन अश्रू गळू लागले. शेजारी त्याची आजी होती. आजी घाबरून गेली. अरे सुरेश काय झालं? का रडतो? वास्तविक ते दुःखाचे नसून सुखाचे अश्रू होते कारण त्याला शाळेत शिक्षक म्हणून नोकरी लागली होती. त्याचा तो आदेश होता.
तो आजीच्या गळयाला पडून नाचू लागला. आजीला आणि घरातील सर्वांना कळले की सुरेशला गुरुजींची नोकरी लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी सुरेशने थेट गुरुजींचे घर गाठले. त्यांच्या पाया पडला आणि ते पत्र दाखवले. गुरुजींना देखील अपार आनंद झाला. सुरेशने घेतलेल्या मेहनतीचे चीज झाल असे त्यांना वाटल. शिक्षणाने लवालेली त्या एका ज्योतींने आज घरातील सर्वच जण सुखा समाधानाने जीवन जगत आहेत. शिक्षण हे जीवन विकासाचे साधन आहे.

# अंधारातील दिवा

" सर आत येऊ का? "

दारावर एक मुलगा उभा होता आणि आत येण्याची परवानागी मागत होता.

"अरे ये ना आत ये हे काय शाळा आहे काय परवानागी मागण्यासाठी "

तो आत आला सरांच्या पायाला स्पर्श केला आणि हातात पेढा देत म्हणाला

"सर मी दहावी पास झालो. "

"अभिनंदन बेटा किती मार्क पडले? "

" सर 83 टक्के पडले "

" व्वा . . ! छान . . ! अभिनंदन बेटा . . ! भविष्यात अशीच प्रगती कर. "

" धन्यवाद सर,आज मी जे काही मिळवले ते फक्त तुमच्यामुळे म्हणून सर्वात पहिल्यांदा तुमच्याकडे आलो"

" म्हणजे. . . ? मला कळाले नाही, तु कोण आहेस? तुझे नाव काय? " सर मोठ्या आश्चर्यने विचारले.

" सर, मला नाही ओळखले . . . ! मी रमेश . . "

सर आठवण करू लागले की हा कोणता रमेश? काही आठवण येत नव्हती तेंव्हा रमेशने शाळेतील एक आठवण सांगितली जे की सर कधी ही विसरु शकत नाहीत.

" सर, मी रमेश, शेळी राखणारा . . . . . "

असे म्हटल्यावर सराना सर्व आठवले. सरानी रमेशला खुप शुभेच्छा दिल्या आणि सोप्यावर बसायला ही सांगितले. रमेशची ओळख झाल्यावर सर खुप आंनदात दिसत होते. त्यांनी त्याला चहा-फराळ दिले आणि काही अडचण पडल्यास मला सांग असे बोलून त्याचा निरोप घेतला

रमेशची पाठमोरी आकृति बघत पवार सर भूतकाळात गेले. रामपूर नावाचे गाव जेथे पाचवी वर्गापर्यंत शाळा होती आणि तीन शिक्षक तिथे शिकवित होते. त्यात पवार सराना त्या शाळेवर जाऊन जेमतेम एक वर्ष झाले होते. जून महीना उजाडला, शाळेला नेमके सुरु झाली होती. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील जी मुले नियमित शाळेत येऊ शकत नाहीत त्यांची नावे हजेरी पटावरुन कमी करण्यात येणार होते. दुसऱ्या वर्गातील दोन आणि तिसऱ्या वर्गातील दोन अशी चार मुले मुख्याध्यापकाच्या रडारवर होती. ही मुले जर हजेरी वरुन कमी झाली तर शाळाबाह्य होतात आणि शासनाने शाळाबाह्य कोणी राहणार नाही याची काळजी घ्यावे अशी स्पष्ट सूचना केली होती. मुख्याध्यापकानी पवार सराना बोलावून घेऊन त्या चार मुलांच्या घरी भेट देण्यासाठी सांगितले. मग पवार सर त्या चार मुलांच्या भेटीसाठी शाळेबाहेर पडले. पहिल्यांदा रमेशच्या घरी त्यांचा प्रवेश झाला. शाळेपासून पन्नास पाऊल अंतरावर रमेशचे छप्पर होते. सकाळची वेळ असल्यामुळे सर्व जण घाईमध्ये होते. कोणी शेतात जायची घाई करीत होते तर कोणी जंगलात. रमेश देखील तयार होता. तो रोज 20-25 शेळया घेऊन जंगलात जातो. त्याचे त्याला काही पैसे मिळत होते. गुरुजींनी रमेशच्या वडिलांना समजावून सांगितले की रमेशला शाळेत पाठवा त्याची जागा जंगलात नाही तर शाळेत हाय. वडील काही ऐकायला तयार होत नव्हते. शेवटी एका अटीवर कसेबसे ते समजून घेतले आणि रमेशला शाळेत पाठविण्यास तयार झाले. तिथुन स्वारी निघाली शिल्पाच्या घरी. तसे तर शिल्पा, निता आणि कविता एकाच वाड्यात राहत होती. ह्या तिन्ही मुलीं त्यांच्या आईला घरकामात मदत करत होत्या आणि घरातील लहान भावंडे सांभाळत सांभाळत त्यांच्या बहिणी जे बीडी वळत होते त्यांच्यासोबत ह्या मुली बीडीला दोरा बांधण्याचे काम करीत असत. एकीला बघून एकी शाळेत येत नव्हते आणि घरच्या लोकांना मदत करीत असल्यामुळे कोणी काही म्हणत नव्हते. पण पवार सर त्यांच्या आई-बाबांनाशिक्षणाचे महत्व पटवून सांगितले असता ते ही एका अटीवर राजी झाले. पवार सर आनंदात शाळेत परत आले आणि मुख्याध्यापकाना

घडलेला वृतांत सांगितला. यावर मुख्याध्यापक हसायला लागले आणि म्हणाले, सर तुम्हाला वाटते की, ते शाळेत येतील म्हणून . . . ? पण पवार सरला विश्वास होता की ते येतील म्हणून. अर्ध्या तासानंतर सर्वात पहिल्यांदा रमेश शाळेत आला सोबत त्याच्या शेळया होत्या. मुख्याध्यापकानी हे पाहिले आणि म्हणाले अरे रमेश ह्या शेळया कुठे आणला आहेस? यावर रमेश म्हणाला, सरच म्हणाले की, शेळया घेऊन का होईना पण शाळेत ये म्हणून मी आलो. नाही तर चाललो मी जंगलात. हे ऐकताच मुख्याध्यापक पवारसरा कडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागले. पवार सरानी होकरार्थी मान हलविली आणि रमेशला घेऊन वर्गाकडे जाऊ लागले. शाळेच्या मोकळया मैदानात सर्व शेळया सोडून रमेशला वर्गात बसविले आणि मुलांना सक्त ताकीद दिली की रमेशला कोणी त्रास देऊ नये. दहा-पंधरा मिनीटानंतर शिल्पा, निता आणि कविता आपल्या लहान भावंडाना घेऊन शाळेत आली. मुख्याध्यापक या तीन मुलींना शाळेत भावंडे आणु देत नसत त्यामुळे ते तिघी शाळेत येत नव्हते. आत्ता ही मुख्याध्यापक रागात आले होते पण पवार सरानी काही म्हणू दिले नाही. पालक याच अटी वर तर मुलीला शाळेत पाठविण्यास तयार झाले होते. एक महिना असेच चालले होते. पवार सर त्याच्या मनात शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्यात यशस्वी झाले होते. हळू हळू त्यांना लिहिण्याची आणि वाचण्याची गोडी लागली. दोन महिन्यानंतर रमेश शाळेकडे एकटा येताना दिसला. त्याच्या सोबत आज शेळया दिसत नव्हते. सर्वप्रथम मुख्याध्यापकाला याचे आश्चर्य वाटले की, याचे शेळया गेल्या कुठे? पवार सरानी गावातील एका व्यक्तीला ह्या शेळया राखण्याचे काम दिले होते त्यामुळे रमेश त्या शेळयापासून मुक्त झाला होता. काही दिवसानंतर ही बाब घरात कळली. पण रमेशची अभ्यासातील गती पाहून त्याच्या वडिलांनी काही म्हटले नाही. इतर मुलाच्या तुलनेत रमेश चांगल्या गतीने शिकत होता. त्याची प्रगती पाहून पवार सराना देखील आनंद होत होता. पवार सरानी शिल्पा, निता आणि कविता ह्यांच्या भावंडाना अंगणवाडी मध्ये व्यवस्था केली तेंव्हा त्यांची पण समस्या सुटली. ती मुलीं देखील चांगला अभ्यास करू लागली. पाचव्या वर्गापर्यंत त्यांनी नियमित शाळेत आली. त्यांना शाळेची आणि शिक्षणाची गोडी निर्माण झाली. शाळा सोडताना त्यांना खुप दुःख झाले. पवार सरानी एकच वाक्य म्हटलें होते की, काही ही करा, किती ही संकटे येवो आणि किती ही त्रास होऊ द्या पण शाळा सोडू नका, शिकत रहा. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे त्यांनी कोठे ही मध्यंतरी शाळा न सोडता शिक्षण घेतले त्यामुळे आज रमेश मोठ्या अभिमानाने

त्यांच्या घरी येऊन पास झाल्याची बातमी घेऊन आला. आज पवार सरांना करोडपती झाल्याचा आनंद वाटत होता. शिक्षण प्रवाहाच्या बाहेर जाणाऱ्या मुलांना रस्त्यावर आणल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट झळकत होते. अंधारात लावलेला दिवा चांगल्या प्रकारे प्रकाश देत होता.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.
किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.